सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०६ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

स्मार्ट मीटरने वीज बंद झाली, तरी चोरीने वापर सुरुच ! जळगावात 28 जणांवर गुन्हे

जळगाव : थकीत वीजबिलामुळे स्मार्ट मीटरद्वारे वीजपुरवठा आपोआप खंडित झाल्यानंतरही अनधिकृतपणे वीज जोडणी करून वापर करणाऱ्या ग्राहकांविरोधात महावितरणने जळगाव विभागात धडक मोहीम सुरू केली आहे. ऑगस्ट महिन्यात राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत तब्बल 28 ग्राहक वीज चोरी करताना आढळून आले. या सर्वांविरोधात भारतीय विद्युत कायद्याच्या कलम 135 अंतर्गत विविध पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत तब्बल 11 हजार 606 युनिट वीजचोरी उघडकीस आली असून, महावितरणचे अडीच लाखांहून अधिक रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

बिल भरलं नाही, तरी जोडली वीज

स्मार्ट मीटर बसविण्यात आलेल्या ग्राहकांचा वीजपुरवठा थकबाकीमुळे 'ऑटो डिस्कनेक्ट' केला जातो. म्हणजेच थकीत बिलामुळे वीजपुरवठा आपोआप बंद होतो. ग्राहकाने थकीत वीजबिल भरल्यानंतर वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. मात्र, काही ग्राहकांनी बिलाचा भरणा न करताच खंडित केलेली वीजजोडणी स्वत:हून पुन्हा जोडली आणि अनधिकृतपणे वीज वापरण्यास सुरुवात केली. ही बाब लक्षात आल्यानंतर जळगाव विभाग कार्यालयाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली.

विशेष पथकांकडून जोडण्यांची तपासणी

ऑटो डिस्कनेक्ट झाल्यानंतर संबंधित ग्राहक प्रत्यक्षात वीजविना आहे की अनधिकृतपणे वीज वापरत आहे, याची पडताळणी करण्यासाठी महावितरणने विशेष पथके तयार केली. या पथकांनी थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांच्या जोडण्यांची तपासणी केली. तपासणीदरम्यान 28 ग्राहकांनी बिल न भरताच अनधिकृतरीत्या वीजपुरवठा सुरू केल्याचे आढळून आले. यानंतर संबंधितांविरोधात वीज चोरीची कारवाई करण्यात आली आणि कलम 135 अंतर्गत पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले.

नशिराबादपासून जळगावपर्यंत कारवाई

वीज चोरी केल्याच्या आरोपावरुन पोलिसांत गुन्हे दाखल झालेल्यांमध्ये नशिराबाद येथील शेख इरफान शेख खलील पिंजारी, शेख अजिम शेख युसूफ यांचा समावेश आहे. भादली बुद्रुक येथील श्रीधर नारायण ठाकूर, नारायण विठ्ठल जावळे, गोपिकाबाई सखाराम पाटील, मोतीराम लक्ष्मण पाटील, शिवाजी कडू कोळी, जंगलू सुपडू सपकाळे आणि उषाबाई गणेश कोळी यांच्यावरही कारवाई करण्यात आली. डोमगाव येथील मुरलीधर गिरधर महाले व दिगंबर प्रभाकर जाधव तसेच जळगावातील प्रतिभा रितेश पवार, लक्ष्मी भानुदास बागडे, स्वप्नील प्रशांत सौंदाणे, देवीदास गणपतराव शिंदे, शेख रफिक हबीब, शाहरूख खान पठाण, संजय भगवान महाजन, अकीब शाह अब्दुल रहमान शाह, गणी चिंधा पटेल, शेख आरिफ बिस्मिल्ला, मोहंमद इरफान तांबोळी, शफी गफूर पटेल, शेख कय्युम हुसेनखा, दिलीप सूरजमल लाठी, नवीद जमील शेख, मनीषा विनोद जोशी आणि रसुबाई तुकाराम पाटील यांच्यावरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव विभागाचे कार्यकारी अभियंता दत्तात्रेय साळी आणि त्यांच्या पथकाने केली.

वीज चोरीसोबत जीवितालाही धोका

थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर स्वत:हून किंवा इतरांच्या मदतीने वीज जोडणी करणे हा केवळ कायदेशीर गुन्हा नाही, तर जीवघेणाही ठरू शकतो. अनधिकृत जोडणी करताना प्राणांतिक विद्युत अपघात होण्याचा धोका असतो. त्यामुळे

गोविंदा आला रे आला!'; मुंबई-ठाण्यात दहीहंडीचा जल्लोष, ढोल-ताशांचा निनाद अन् गोविंदांचा जोश

मुंबई : 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषात आणि ढोल-ताशांच्या गजरात मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह राज्यभरात आज दहीहंडीचा जल्लोष आणि उत्साह पाहायला मिळाला. गोविंदा पथकांनी एकावर एक थर रचत दहीहंडी फोडण्याचे थरारक आव्हान स्वीकारले. ठाण्यात सकाळपासूनच दहीहंडी उत्सवाची लगबग सुरू झाली होती. विविध गोविंदा पथकांचे ढोल-ताशांच्या गजरात आगमन होताच परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. 'गोविंदा आला रे'च्या घोषणांनी आणि पारंपरिक वाद्यांच्या तालाने शहर दुमदुमून गेले. (Dahi Handi 2026)

दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदांनी मानवी मनोरे रचले. काही पथकांना पहिल्याच प्रयत्नात हंडी फोडण्यात यश आले, तर काही ठिकाणी थर

कोसळल्यानंतर गोविंदांनी पुन्हा जोमाने मनोरे उभारले. त्यामुळे दहीहंडीच्या मैदानात चुरस आणि थरार पाहायला मिळाला.

लाखोंची बक्षिसे आणि विक्रमांची चुरस

यंदाच्या दहीहंडी उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे मोठ्या रकमेची बक्षिसे आणि विक्रमांचे आव्हान. मानाच्या दहीहंड्यांवर लाखो रुपयांची बक्षिसे जाहीर करण्यात आली असून, ती पटकावण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये चुरस पाहायला मिळाली. ठाण्यातील काही दहीहंड्यांसाठी तर ७१ लाख रुपयांपर्यंतच्या बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुण्यातील प्रमुख दहीहंडी उत्सवांमध्ये सेलिब्रिटी आणि मान्यवरांची उपस्थितीही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. त्यांच्या उपस्थितीमुळे गोविंदा पथकांचा उत्साह आणखी वाढला. ढोल-ताशांचा निनाद, गोविंदांच्या घोषणा आणि उंचच उंच मानवी मनोरे अशा उत्सवी वातावरणात यंदाची दहीहंडी रंगली. त्यामुळे मुंबई-ठाण्यातील रस्त्यांवर आज 'मच गया शोर सारी नगरी रे...' म्हणत गोविंदांच्या थरारक खेळीचा अनुभव पाहायला मिळाला.

पुण्यात डीजेचा दणदणाट भोवला! नियम मोडल्याने कारवाई; साऊंड सिस्टिम जप्त

पुणे : पुण्यात दहीहंडी उत्सवाचा उत्साह सुरू असतानाच ध्वनी प्रदूषणाविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. बिबवेवाडी परिसरातील श्रीकृष्ण तरुण मंडळाविरोधात परवानगीपेक्षा अधिक लाऊडस्पीकर लावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मंडळाची साऊंड सिस्टिमही जप्त केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, दहीहंडी कार्यक्रमासाठी मंडळाला लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, या परवानगीच्या अटींचे उल्लंघन करत मंडळाने 4 बेस आणि 4 टॉपऐवजी तब्बल 8 बेस आणि 8 टॉप स्पीकर लावले. त्यामुळे परिसरात मोठ्या आवाजात ध्वनी प्रदूषण होत असल्याची बाब पोलिसांच्या निदर्शनास आली.

बिबवेवाडी ओटा येथील श्रीकृष्ण मंडळाने दहीहंडी उत्सवासाठी पोलिसांकडून परवानगी घेतली होती. मात्र, परवानगीमध्ये दिलेल्या नियमांचे पालन न करता अतिरिक्त साऊंड सिस्टिमचा वापर केल्याचा आरोप आहे. यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे पोलिसांनी नमूद केले.

दरम्यान, दहीहंडी आणि आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी ध्वनी प्रदूषणाच्या मुद्द्यावर कठोर भूमिका घेतली आहे. मोठ्या आवाजात डीजे किंवा लाऊडस्पीकर वाजवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा यापूर्वीच देण्यात आला आहे. सण-उत्सव साजरे करताना नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. पुण्यात सध्या डीजे आणि ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा चर्चेत असून, उत्सव आणि ध्वनी मर्यादा यावरून वादही सुरू आहे.

शिक्षक दिनानिमित्त PM मोदींचा शिक्षकांशी मनमोकळा संवाद

नवी दिल्ली : शिक्षक दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील आपल्या निवासस्थानी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्यांशी मनमोकळा संवाद साधला. या वेळी शिक्षण पद्धती, मुलांचे वाढते मोबाईलचे व्यसन, अमली पदार्थांचा धोका आणि मुलांमधील सुप्त गुण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर हलक्या-फुलक्या वातावरणात चर्चा झाली. संवादादरम्यान एका शिक्षिकेने सांगितले की, त्या शाळेत मुलांकडून मुलाखती घेण्याचा सराव करून घेतात. यावर पंतप्रधान मोदी हसून म्हणाले, "म्हणजे ही मुले घरी जाऊन पालकांचीही मुलाखत घेत असतील! 'आज हाच स्वयंपाक का केला ? एवढा खर्च का झाला?' असे प्रश्न विचारून त्यांनी पालकांना त्रस्त केले असेल." पंतप्रधानांच्या या विनोदावर सर्वांमध्ये एकच हशा पिकला. वक्तृत्व शिकवणाऱ्या एका शिक्षिकेला पंतप्रधानांनी विचारले, "जर मी तुमचा विद्यार्थी असतो, तर मला चांगला वक्ता बनण्यासाठी तुम्ही काय सल्ला दिला असता?" यावर शिक्षिकेने "आत्मविश्वास हवा" असे सांगितले, पण पंतप्रधान समोर असल्यामुळे त्या स्वत:च थोड्या घाबरल्या. यावर मोदींनी मिश्किलपणे विचारले, "म्हणजे उत्तम वक्ता बनण्यासाठी वलय (Aura) नसले पाहिजे का? नाहीतर लोक भाषण ऐकण्याऐवजी फक्त वलयाकडेच पाहत राहतील."

प्रारूप मतदार याद्यांचे राजकीय पक्षांना वितरण

अहिल्यानगर, प्रतिनिधी : विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम-२०२६ अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार याद्यांचे मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना वितरण करण्यात आले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षाचे उत्तर विभागाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, दक्षिण विभागाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर तसेच शहराध्यक्ष अनिल मोहिते यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रारूप मतदार याद्या स्वीकारल्या. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दळवी व उपाध्यक्ष रावजी नांगरे यांनीही याद्या स्वीकारल्या.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने जिल्हाध्यक्षांचे प्राधिकृत प्रतिनिधींनी प्रारूप

मतदार याद्या घेतल्या आहेत. याशिवाय बहुजन समाज पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने याद्यांच्या संगणकीकृत प्रती यापूर्वीच घेण्यात आल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी दिली.

उर्वरित दोन-तीन मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या वतीने प्रारूप मतदार याद्या घेणे बाकी आहे. संबंधित पक्षांनी या याद्या घेऊन जाव्यात, असे आवाहन गाढे यांनी केले आहे.

यंदा प्रथमच संगणकीकृत तसेच छापील अशा दोन्ही स्वरूपात प्रारूप मतदार याद्या उपलब्ध करून देण्यात आल्याने सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या जिल्हाध्यक्षांच्या स्तरावरून या याद्या तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती संबंधित जिल्हाध्यक्षांनी दिली.

पेपरफुटी रोखण्यासाठी राज्यातील परीक्षा पद्धतींचा फेरआढावा घेणार

मुंबई : राज्यातील सरकारी भरती परीक्षांच्या पारदर्शकतेवर आणि विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्न उपस्थित होत असताना, राज्य सरकारने संपूर्ण परीक्षा पद्धतीचाच साकल्याने फेरआढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ती उमेदवारांच्या हाती पडेपर्यंतची प्रक्रिया, परीक्षा केंद्रांची सुरक्षा, तंत्रज्ञानाचा वापर, बनावट उमेदवार, प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकार, प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर आणि निकालापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १२ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा समितीत समावेश आहे.

नांदेड आनंदनगर स्पा प्रकरण; पोलीसांकडुन पैशांची मागणी होत असल्याचा आरोप

तभा वृतसेवा

नांदेड, दि. 5 सप्टेंबर -

शहरातील विमानतळ पोलिस ठाणे हद्दीतील आनंदनगर परिसरामध्ये मानवी तस्करी व तत्सम कलमांमुळे राज मॉल आनंदनगर येथे स्पावर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणांमध्ये काहीही संबंध नसताना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकविण्यात आले असून विमानतळ पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेकडुन मोठ्या रकमेची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

राज मॉल येथे झालेल्या वरील कार्यवाही बाबत पवितसिंघ नरेंद्र सिंघ आरत्या यांनी पोलीस अधीक्षक व संबंधितांना निवेदन देऊन आरोप केला आहे की पोलीस स्टेशन विमानतळ चे निरीक्षक रामदास शेंडगे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी त्यांनागुन्हा क्रमांक 368/2026 विमानतळ कलम 4, 5, 6,7 व टाकले आहे.

सदर गुन्ह्यांमध्ये सदर गुन्ह्यामध्ये पवितसिंघ नरेंद्रसिंघ आरतिया यांनी पोलीस उप महानिरीक्षक उमाप यांना दिलेल्या निवेदनात विमानतळ पोलिस ठाण्याचे निरीक्षक रामदास शेंडगे व स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अतुल भोसले हे विविध नंबरवर वारंवार फोन करून त्यांच्याकडे पैशाची मागणी करत असल्याचे म्हटले आहे. या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करुन वैयक्तिक व कुटुंबीयांची होत असलेली बदनामी थांबवून न्याय द्यावा अशी मागणी पवितसिंघ आरतिया यांनी केली आह.

सदर गुन्ह्यामध्ये पवितसिंघ नरेदरसिंघ आरतिया यांना आनंदनगर राज मॉल स्पा सेंटर विनाकारण नाव गोवल्यामुळे झालेल्या बदनामीस कारणीभूत असलेले रामदास शेंडगे स्थानिक पोलीस शाखेचे निरीक्षक अतुल भोसले व त्यांचे सहकारी इम्रान यांचेवर कायदेशीर कारवाई करून अभय देण्यात यावे अन्यथा या विरोधामध्ये न्यायालयीन कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

'बॉटल्स फॉर चेंज' अंतर्गत 'एसबीआय' अन् 'बिस्लेरी'चा करार

मुंबई : देशातील सर्वांत मोठी सार्वजनिक बँक असलेल्या 'स्टेट बँक ऑफ इंडिया' (SBI) आणि पिण्याच्या पाण्याच्या क्षेत्रात नामांकित असणाऱ्या 'बिस्लेरी इंटरनॅशनल'कंपनीने प्लास्टिक कचऱ्याच्या योग्य विल्हेवाट आणि व्यवस्थापनासाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. बिस्लेरीच्या 'बॉटल्स फॉर चेंज' या विशेष उपक्रमांतर्गत हा करार करण्यात आला असून, याद्वारे एसबीआयच्या देशभरातील विविध शाखा व कार्यालयांमध्ये जमा होणारा प्लास्टिक कचरा गोळा करून तो पुन्हा प्रक्रियेसाठी (Recycling) पाठवला जाणार आहे.

कर्मचाऱ्यांना मिळणार प्लास्टिक व्यवस्थापनाचे धडे या संयुक्त उपक्रमांतर्गत बिस्लेरी कंपनीतर्फे एसबीआयच्या अधिकारी, बँक कर्मचारी तसेच हाऊसकीपिंग स्टाफसाठी विशेष प्रशिक्षण आणि प्रबोधन वर्गांचे आयोजन केले जाईल. कार्यालयांमध्ये वापरलेल्या प्लास्टिकचे योग्य वर्गीकरण कसे करावे आणि त्याचे संकलन कसे करावे, याचे मार्गदर्शन कर्मचाऱ्यांना दिले जाणार आहे. या प्रबोधनामुळे कर्मचाऱ्यांमध्ये केवळ कामाच्या ठिकाणीच नव्हे, तर त्यांच्या घरात आणि समाजातही प्लास्टिक कचऱ्याविषयी मोठी जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल.

या कराराबाबत बोलताना एसबीआयचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रवी रंजन यांनी सांगितले की, दैनंदिन कार्यालयीन कामकाजात पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे. 'विकसित भारत २०४७' आणि भारताचे २०७० पर्यंतचे 'नेट झिरो' कार्बन उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्याच्या दृष्टीने ही भागीदारी अत्यंत मोलाची ठरेल.

शिर्डीच्या 'साई निर्माण ग्रुपची 12 ज्योतिर्लिंग यात्रा यशस्वी; 1500 साई भक्त सुखरूप परतीच्या मार्गावर

शिर्डी (प्रतिनिधी) : साई निर्माण ग्रुप व साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट आणि शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली '१२ ज्योतिर्लिंग यात्रा' अत्यंत यशस्वीरित्या पार पडली असून, या यात्रेत सहभागी झालेले तब्बल १५०० साई भक्त सध्या सुखरूप परतीच्या मार्गावर आहेत.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

कोरोना महामारीमुळे मागील काही वर्षांपासून खंड पडलेली ही बहुप्रतिक्षित यात्रा यावर्षी पारायण सोहळ्यानंतर मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली. त्यानुसार, २९ ऑगस्ट रोजी साईनगर शिर्डी रेल्वे स्थानकावरून एका विशेष रेल्वेने ही यात्रा नेपाळ व उत्तर भारत तीथयात्रेसाठी रवाना झाली होती .या यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यापूर्वीच्या टप्प्यात राहिलेली, मात्र अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी दोन ज्योतिर्लिंग व आयोध्यो तील राम मंदीर या प्रवासात समाविष्ट करण्यात आली होती. यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांनी सर्वप्रथम काशी येथे 'काशी विश्वनाथाचे' दर्शन घेतले.

त्यानंतर अयोध्येत येऊन भव्य रामललाच्या मंदिराचे दर्शन घेण्याचा सुवर्णयोग भाविकांना लाभला. भारतातील या स्थळा नंतर यात्रा नेपाळ देशात रवना झाली . उत्तर प्रदेशातील नौतनवा रेल्वे स्थानकावरून बसने भारत-नेपाळ सीमेचा प्रवास करत भाविक थेट काठमांडू येथे पोहोचले. तिथे पशुपतीनाथ ज्योतिर्लिंग आणि मनोकामना मातेचे दर्शन घेऊन सर्व भाविक आता शिर्डीच्या दिशेने परतीच्या प्रवासाला निघाले आहेत.

(चोख नियोजन आणि उत्कृष्ट व्यवस्था

हजारहून अधिक भाविकांच्या या मोठ्या यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून आयोजकांतर्फे अत्यंत काटेकोर नियोजन करण्यात आले होते.प्रवाशांसाठी मिष्टान्न भोजन, चहा-नाश्ता व फराळाची उत्तम सोय करण्यात आली होती भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी २४ तास आरोग्य सेवा पुरवण्यात आली.प्रवासादरम्यान सोयीस्कर बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. या उत्तम आणि निर्विघ्न नियोजनामुळे ही कठीण यात्रा अत्यंत यशस्वी ठरली , सर्व १५०० साई भक्त परतीच्या प्रवासात असून लवकरच शिर्डीत सुखरूप परतणार आहेत)

बीड शहरात औषधी अमली पदार्थांवर कारवाई; एकास बेड्या, 1,15,000 रुपयांचा मुद्देमाल जप्त

बीड : बीड शहरात अवैध अमली पदार्थ विक्री करणाऱ्या एका इसमावर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली असून त्याच्याकडून १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बीड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर आणि त्यांच्या पथकाला गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहिती मिळाली होती. चांदनी चौक ते काळा हनुमान चौक जाणाऱ्या रोडवर एक इसम पांढऱ्या रंगाच्या स्कूटी गाडीच्या फुट रेस्टमधील पांढऱ्या रंगाच्या पिशवीत अमली पदार्थ औषधाच्या बाटल्या विक्रीसाठी घेऊन जाणार असल्याची माहिती होती. या माहितीनुसार वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध सह आयुक्त माधव जगन्नाथ निमसे यांच्यासह पथकाने मिळालेल्या ठिकाणी सापळा रचला.

त्यादरम्यान एक इसम पांढऱ्या रंगाच्या ॲक्सेस गाडीवर (क्रमांक MH.23 BL 4259) बसून जात असताना पोलिसांना निदर्शनास आला. पोलिसांनी त्याला थांबवून त्याची झडती घेतली असता, त्याच्या ताब्यातून सुमारे ४०,००० रुपये किमतीच्या औषधी अमली पदार्थ सदृश प्लास्टिकच्या सिलबंद विना लेबलच्या १६० बाटल्या आणि ७५,००० रुपये किमतीची ॲक्सेस गाडी असा एकूण १,१५,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अफताब सलीम खान पठाण (वय २८ वर्षे, रा. दाऊदपुरा पेठ, बीड) असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्याविरुद्ध पोलीस ठाणे पेठ बीड येथे गुन्हा क्रमांक २८३/२०२६ नुसार कलम ८(क), २२(ब) एनडीपीएस कायदा तसेच कलम ३२८, २७६ भारतीय न्याय संहिता आणि कलम १८(अ), (क), २७ (ख)(दोन) औषधीद्रव्य सौंदर्य प्रसाधन अधिनियमन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन सह आयुक्त माधव जगन्नाथ निमसे, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/गोविंद राखे, पोह/अर्जुन यादव, पोअ/मनोज परजणे, पोअ/अश्पाक सय्यद, पोअ/बबन सलगर, चापोह/नितीन वडमारे यांनी केली आहे. बीड पोलीस दलातर्फे 'नशामुकत बीड' अभियान राबवले जात असून, अमली पदार्थाबाबत माहिती मिळाल्यास नागरिकांनी त्वरित ११२ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले असून माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शेतीच्या फेरफारासाठी एक लाखांच्या लाचेची मागणी; अंबाजोगाईत मंडळ अधिकारी 'एसीबी'च्या जाळ्यात

अंबाजोगाई : तक्रारदाराच्या शेतीच्या फेरफाराची नोंद करून देण्यासाठी तब्बल एक लाख रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या एका मंडळ अधिकाऱ्याविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. सतीश विठ्ठलराव भुसेवाड (वय ४१, रा. बानाई नगर, अंबाजोगाई) असे या लाचखोर अधिकाऱ्याचे नाव असून तो अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगाव येथे कार्यरत होता. या कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

तक्रारदार यांच्या शेतीच्या फेरफार नोंदीची कार्यवाही करण्यासाठी सतीश भुसेवाड याने तब्बल एक लाख रुपयांची लाच मागितली होती. यासंदर्भात तक्रारदाराने बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) तक्रार नोंदवली. या तक्रारीची दखल घेत एसीबीच्या पथकाने तातडीने पडताळणी केली असता, भुसेवाड याने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, कारवाईचा संशय आल्याने अधिकाऱ्याने लाचेची रक्कम स्वीकारली नाही. मात्र, लाच मागितल्याचे सिद्ध झाल्याने त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. ही धडक कारवाई बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. लाच स्वीकारण्याची मागणी केल्याप्रकरणी सतीश भुसेवाड याच्याविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे.

एआय प्लसचा 'नेक्स्ट क्वांटम ओएस 1.1' सादर

मुंबई, भारत : एआय प्लस स्मार्टफोनने 'नेक्स्ट क्वांटम ओएस १.१' सादर केले असून, या आवृत्तीत डेटा सुरक्षा, गोपनीयता आणि वापरकर्त्यांचे नियंत्रण अधिक मजबूत करण्यात आले आहे. 'सॉव्हरिन डेटा बाउंड्री'मुळे ॲप्लिकेशन्समधील १०० टक्के डेटा वाहतूक भारतातील पायाभूत सुविधांमध्येच ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. नव्या 'नेक्स्ट प्रायव्हसी डॅशबोर्ड'द्वारे वापरकर्त्यांना ॲप परवानग्या एकाच ठिकाणी पाहता, बदलता आणि रद्द करता येणार आहेत. पार्श्वभूमीत ॲप्सकडून होणाऱ्या संसाधनांच्या वापराबाबतही सूचना मिळणार आहेत. एआय प्लसचे माधव शेठ यांनी तंत्रज्ञानातील विश्वास आणि वापरकर्त्यांच्या आकांक्षांना सक्षम करण्याला कंपनीच्या दृष्टिकोनाचे केंद्रस्थान असल्याचे सांगितले.

टॅप टू टेकऑफ: स्कॅपिया आणि ॲक्सिस बँकेचे संयुक्त-ब्रँडेड क्रेडिट कार्ड सादर

पुणे : स्कॅपिया आणि ॲक्सिस बँकेने नव्या पिढीच्या प्रवाशांसाठी 'स्कॅपिया ॲक्सिस बँक क्रेडिट कार्ड' सादर केले. कार्डद्वारे पेमेंट्स, रिवॉर्ड्स आणि ट्रॅव्हल बुकिंगचा डिजिटल अनुभव एकत्रित करण्यात आला आहे. पात्र दैनंदिन खर्चावर १० टक्क्यांपर्यंत, तर स्कॅपिया ॲपवरील पात्र ट्रॅव्हल बुकिंगवर २० टक्क्यांपर्यंत स्कॅपिया कॉइन्स मिळणार आहेत. फ्लाइट्स, हॉटेल्स, व्हिसा आणि अनुभवांसाठी हे कॉइन्स वापरता येतील. कार्डमध्ये शून्य फॉरेक्स मार्कअप, स्मार्ट फॉरेक्स, विमानतळ लाउंज आणि डिजिटल ऑनबोर्डिंगसारख्या सुविधा आहेत. हे कार्ड मास्टरकार्ड आणि रुपे नेटवर्कवर उपलब्ध असून, ऑनबोर्डिंग ३ सप्टेंबरपासून सुरू झाले आहे.

सर्वात मोठ्या ट्रान्सफॉर्मर निर्मिती प्रकल्पातून पहिला ट्रान्सफॉर्मर तयार

छत्रपती संभाजीनगर : अभियांत्रिकी क्षेत्रातील आघाडीची कंपनी आणि इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग उद्योगातील प्रमुख कंपनी सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेड (सीजी) ने आज मध्य प्रदेशातील सीहोर येथे उभारलेल्या आपल्या नवीन ग्रीनफिल्ड उत्पादन प्रकल्पातून पहिला पॉवर ट्रान्सफॉर्मर तयार झाल्याची घोषणा केली.५० एकर क्षेत्रावर विस्तारलेला हा प्रकल्प भारतामधील एकाच ठिकाणी असलेला सर्वात मोठा पॉवर ट्रान्सफॉर्मर निर्मिती प्रकल्प आहे. या प्रकल्पात २२० केव्ही ते १२०० केव्ही क्षमतेच्या श्रेणीतील पॉवर ट्रान्सफॉर्मर्सची निर्मिती केली जाणार असून, दरमहा ३५ पॉवर ट्रान्सफॉर्मर्स तयार करण्याची क्षमता या प्रकल्पाची आहे. पहिला ट्रान्सफॉर्मर तयार झाल्याच्या या महत्त्वपूर्ण प्रसंगी मध्य प्रदेशचे माननीय मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव उपस्थित होते.

पोको एक्स8 सिरीज उत्तम कार्यक्षमता

बेंगळुरू: पोको इंडियाने आज आपल्या पोको एक्स८ सिरीजमधील नवीन स्मार्टफोन्स - पोको एक्स८ आणि पोको एक्स८ पॉवर लाँच करण्याची घोषणा केली. आधुनिक स्मार्टफोन वापरकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन केलेली ही नवीन सिरीज शक्तिशाली परफॉर्मन्स, मोठे डिस्प्ले, वैविध्यपूर्ण कॅमेरे, मोठ्या क्षमतेच्या सिलिकॉन-कार्बन बॅटऱ्या आणि प्रबळ टिकाऊपणा यांचे एकत्रीकरण करते, ज्यामुळे वापरकर्त्यांना काम, मनोरंजन आणि दैनंदिन जीवनात अधिक गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य मिळते.

ॲम्युनिशन पुरवठा करार

नवी दिल्ली: अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेसने इंडो-रशियन रायफल्स प्रायव्हेट लिमिटेड (आयआरआरपीएल) सोबत पाच वर्षांचा करार केला आहे. आयआरआरपीएल ही भारतात एके-203 असॉल्ट रायफल्सची निर्मिती करणारी भारत-रशिया संयुक्त उपक्रम कंपनी आहे. या करारांतर्गत अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेसकडून या कार्यक्रमासाठी स्वदेशी 7.62x39 मिमी लघु-कॅलिबर ॲम्युनिशनचा पुरवठा करण्यात येणार आहे.

येत्या 25 सप्टेंबरला 'सायको रंगा' येणार प्रेक्षकांच्या भेटीला

छत्रपती संभाजीनगर - 'सायको रंगा' या आगामी चित्रपटाचा नवीन टीझर प्रदर्शित झाला असून पहिल्या टीझरनंतर आता चित्रपटाच्या कथानकातील महत्त्वाच्या व्यक्तिरेखांची ओळख प्रेक्षकांना होत आहे. या टीझरमध्ये रंगाच्या आयुष्यातील संघर्ष व त्याच्यासोबत असलेल्या आणि त्याच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे कथेला नेमकं कोणतं वळण मिळणार, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

जनावरांसाठी 11 पाण्याचे हौद वाटप ; आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा स्तुत्य सामाजिक उपक्रम

अंबाजोगाई : येथील आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अंबाजोगाईच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत जनावरांसाठी पाणी पिण्याचे ११ हौद वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष उमेशभाऊ पोखरकर यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

उन्हाळ्यात तसेच पाणीटंचाईच्या काळात मुक्या जनावरांची होणारी पाण्यासाठीची भटकंती लक्षात घेऊन त्यांना सहजपणे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते योगेशअप्पा पोखरकर यांच्या वाढदिवसानिमित्त वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता येथील आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अंबाजोगाईच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत जनावरांसाठी पाणी पिण्याचे ११ हौद वाटप करण्यात आले. एकूणच काय तर वाढदिवसानिमित्त सामाजिक आणि विधायक उपक्रम राबवून समाजाप्रती असलेली बांधिलकी जपण्याचा हा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे. आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून गेल्या काही काळापासून विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. यामध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन, गरजू नागरिकांना मदत व सहकार्य, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक ते सहकार्य, वृक्षारोपण, गुरांचे लसीकरण तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात बाधितांना मदत अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. विविध मान्यवरांच्या वाढदिवसानिमित्तही संस्थेच्या माध्यमातून विधायक व समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष उमेशभाऊ पोखरकर यांनी दिली. वाढदिवसाचा आनंद समाजोपयोगी कार्यातून साजरा व्हावा या भावनेतून राबविण्यात आलेला जनावरांसाठी पाण्याचे हौद वाटपाचा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देणारा ठरला आहे. मुक्या जीवांप्रती असलेली आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले. या उपक्रमावेळी आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष उमेशभाऊ पोखरकर, सामाजिक कार्यकर्ते योगेशअप्पा पोखरकर, दीपक लामतुरे, बालाजी रूद्राक्ष, आदित्य देशमुख, तिरूपती राठोड, कृष्णा नरसिंगे, परमेश्वर खाडप आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

तीन दिवसांत चोरीचा गुन्हा उघडकीस; ₹1.54 लाखांचे मिनी गंठण व गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल हस्तगत

अंबाजोगाई : शहरातील जिजाऊ चौक पाटीजवळ, मोरेवाडी परिसरात महिलेच्या गळ्यातील मिनी गंठण खेचून नेल्याचा गुन्हा अंबाजोगाई शहर पोलिसांनी अवघ्या तीन दिवसांत उघडकीस आणला आहे. तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करून पोलिसांनी आरोपीस गुन्ह्यात वापरलेल्या मोटरसायकलसह ताब्यात घेतले असून, चोरीस गेलेले ₹१ लाख ५४ हजार किमतीचे २२ ग्रॅम वजनाचे मिनी गंठण हस्तगत केले आहे.

दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी महिला नामे आशा भारतराव चौधरी या जिजाऊ चौक पाटीजवळ, मोरेवाडी येथून जात असताना मोटरसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील मिनी गंठण खेचून चोरून नेले होते. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३५१/२०२६, कलम ३०४, ३(५) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास करताना अंबाजोगाई शहर पोलिसांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सलग दोन दिवस माहिती संकलित केली. त्यातून आरोपीचा माग काढत पोलिसांनी गुन्हा घडल्यानंतर तीन दिवसांच्या आत धनाजी देविदास शिंदे (वय २६ वर्षे, रा. गंभीरवाडी, ता. कळंब, जि. धाराशिव) यास कळंब येथून गुन्ह्यात वापरलेल्या मोटरसायकलसह ताब्यात घेतले.

आरोपीकडून चोरीस गेलेले २२ ग्रॅम वजनाचे मिनी गंठण, किंमत ₹१,५४,०००/-, तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल हस्तगत करण्यात आली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना मॅडम व मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक रमेश घुले, पोलीस हवालदार पांडुरंग काळे व पोलीस अंमलदार हनुमंत चादर यांनी पार पाडली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रमेश घुले हे करीत आहेत.

ना. पंकजाताई मुंडेंनी शिक्षकदिनी शिक्षकांविषयी व्यक्त केली शुभेच्छेतून कृतज्ञता !

परळीच्या शालेय जीवनातील आठवणींना दिला उजाळा ; शुभेच्छाने शिक्षकही भारावले !

परळी वैजनाथ दि. ०५ --

एखादा व्यक्ती कितीही उच्च पदावर पोहोचला तरी तो आपलं गांव, आपली शाळा व तिथल्या गुरूजनांना विसरत नाही, शालेय जीवनातील आठवणींची शिदोरी त्याच्याकडे असतेच, त्याला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे तरी कशा अपवाद ठरतील? शिक्षक दिनाचे औचित्य साधून आज त्यांनी व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून आपल्या शाळेतील शिक्षकांविषयी कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या.

ना. पंकजाताई मुंडे यांचे दहावी पर्यंतचे शिक्षण शहरातील सरस्वती विद्यालयात झाले. त्यांना अध्यापन करणारे जवळपास सर्वच शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत. ज्यांच्या ज्ञानाचा आणि मार्गदर्शनाचा उपयोग करून आपण यशाचा पल्ला गाठला त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे आपले कर्तव्य आहे अशी प्रामाणिक भावना ठेवून त्यांनी आजच्या शिक्षकदिनी त्यांचा सत्कार केला. त्यांच्या सूचनेनुसार ना. पंकजाताईंचे वर्गमित्र प्रीतेश तोतला, सचिन गिते, पवन मोदाणी, मोहन जोशी तसेच राहूल केंद्रे, स्वीय सहाय्यक अमित गिरडे यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे शिक्षक सर्वश्री नानासाहेब कवडे, शिवशंकर देशमाने, शंकरआप्पा मोगरकर, सुभाष नानेकर, वनमालाताई टाले, सरलाताई बजाज यांच्या घरी जाऊन ना. पंकजाताई मुंडेंच्या वतीने त्यांचा सत्कार केला तसेच कृतज्ञतेचे पत्र दिले. आपली विद्यार्थीनी राज्याची मंत्री असून सुद्धा वेळात वेळ काढून आपली आठवण केली व आपला सत्कार केला हे पाहून शिक्षकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाची समरसता फेरी संपन्न

माजलगाव, दि. ५ प्रतिनिधी : भाशिप्र संस्था अमृत महोत्सव व श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाच्या हीरक महोत्सवाचे औचित्य साधून शैक्षणिक उपक्रम समिती अंतर्गत महाविद्यालयात गोपाळकाला-दहीहंडी, समरसता फेरी व समरसता स्नेहभोजन माजलगावचे आराध्य दैवत श्री सिद्धेश्वर मंदिरात संपन्न झाले.

याप्रसंगी सुरुवातीला महाविद्यालयातून तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या श्री सिद्धेश्वर मंदिरापर्यंत समरसता फेरी काढण्यात आली. त्यानंतर तेथे दहीहंडी हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी ह.भ.प. आदिनाथ कुंडकर महाराज यांचे काल्याचे किर्तन झाले. त्यानंतर सर्व प्राध्यापक कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांना काल्याचा प्रसाद वाटप केला.

प्रास्ताविक प्राचार्य मुकुंद देवर्षी यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना यांनी केले तर आभार डॉ. नामदेव हेडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी शैक्षणिक उपक्रम समितीतील सर्व सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. अभय कोकड, एकनाथ जाधव, उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार महाविद्यालयातील जवळपास 300 विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक, मातृशक्ती उपस्थित होते.

बीड नगर परिषदेमध्ये पहिल्यांदाच एका शाळेने घडविला इतिहास

बीड : दीनदयाल शोध संस्थान संचलित नानाजी देशमुख विद्यामंदिर गोकुळ शिशूवाटिका बीड द्वारा , बीड नगर परिषद स्थापनेपासून पहिल्यांदाच राखी पौर्णिमा साजरी करून सामाजिक बांधिलकी तसेच कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. सर्वप्रथम नगरपरिषद बीडच्या नगराध्यक्षा मा. प्रेमलताताई पारवे, उपमुख्य अधिकारी मा. विश्वंभर तिडके सर , श्री भागवत जाधव स्वच्छता निरीक्षक , यांचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मा. श्री. जगदीश गुरखुदे, श्री. आदित्य माने, श्री.राहुल गुरखुदे, श्री. शुभम धूत, श्री.अशोक तांबारे, श्री. नितीन साखरे, मा.भाग्यश्री ताई देशपांडे, ॲड.गोविंद शिराळे आदी नगरसेवकांची उपस्थिती होती. शालेय समिती सचिव डॉ.सीमाताई जोशी यांनी सर्व मान्यवरांना शाळेचे उद्दिष्ट व शाळेबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. त्यांनी दीनदयाळ उपाध्याय यांची अंत्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या, गरीब आणि वंचित व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे ही कल्पना स्पष्ट केली. त्यामध्ये त्यांनी ज्याला समाजातील इतरांपेक्षा कमी संधी मिळतात त्याला सक्षम करून मुख्य प्रवाहात आणने हा उद्देश सांगितला. बीड स्वच्छ करण्यासाठी आम्ही पण मदत करू हा निर्धार सर्वांसमोर व्यक्त केला. तो उद्देश साध्य करण्यासाठी राखी पौर्णिमेचा कार्यक्रम घेण्यात आला. श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी यांनी आपले विचार व्यक्त केले.

हल्द्वानी 'शुद्धीकरण' जातीयवादी कृत्याचा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या वतीने जाहीर निषेध

दोषींवर अनुसूचित जाती प्रतिबंधात्मक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

माजलगाव :(प्रतिनिधी): हल्द्वानी येथे काँग्रेस पक्षाचे नेते मा. राहुल गांधी जी व काँग्रेस अध्यक्ष मा. मल्लिकार्जुन खरगे जी यांच्या जाहीर सभेनंतर कार्यक्रमस्थळी करण्यात आलेले 'शुद्धीकरण' हे कृत्य अत्यंत निंदनीय, भारतीय संविधानाच्या समानता व बंधुत्वाच्या मूलभूत तत्वांना पायदळी तुडवणारे आणि दलित-वंचित समाजाच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचवणारे आहे.

सदरील घटनेच्या निषेधार्थ आज भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, अनुसूचित जाती विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष गौतम पालजी, विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर यांच्या सूचनेनुसार तसेच माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस अनुसूचित जाती विभाग माजलगाव बीड जिल्ह्याच्या वतीने मा. उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांना निवेदन देण्यात आले.

सदरील निवेदनात हल्द्वानी येथील सदरील 'शुद्धीकरण' कृत्याचा आम्ही तीव्र शब्दात जाहीर निषेध करतो. तसेच सदरील कृत्यात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या, त्यास प्रोत्साहन देणाऱ्या व समर्थन करणाऱ्या सर्व संबंधित व्यक्तींविरुद्ध तात्काळ अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधात्मक कायदा १९८९ (सुधारित २०१५) अंतर्गत गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.भविष्यात अशा प्रकारच्या जातीयवादी, भेदभावपूर्ण कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी व संविधानाच्या मूल्यांचे संरक्षण करावे अश्या प्रकारे न्याय मागण्या करण्यात आल्या आहेत. निवेदनाची गंभीर दखल घेऊन योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तात्काळ गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सदरील निवेदन हे काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले असून, सदर निवेदनावर,अशोक कांबळे,हरिभाऊ चाळक,शहराध्यक्ष आफरोज तांबोळी,कृष्णा शिंदे, जिल्हा सचिव सय्यद याकुब, रशिद शेख,पत्रकार अनंत घडसिंगे,संकेत कासार,बळीराम कारके,अजीज चाऊस, फारुख शेख,यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

परिचारिका, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी 15 सप्टेंबरला धरणे

RMBKSकडून राज्यातील उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालयांसमोर आंदोलन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर

:दि.०५ सप्टेंबर - उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये तसेच स्त्री रुग्णालयांमध्ये कार्यरत परिचारिका व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या विविध प्रशासकीय आणि कार्यस्थळाशी संबंधित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (RMBKS), आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने १५ सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालयांसमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून, प्रशासनाकडून या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी संघटनेने केली आहे. काही अधिकाऱ्यांकडून मनमानी पद्धतीने HRA कपात करणे तसेच परिचारिकांच्या ड्युटीत अनावश्यक हस्तक्षेप केला जात असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

नियम डावलून कनिष्ठ कर्मचाऱ्यांना 'परिसेविका' (Matron/Supervisor) पदाचा पदभार देणे, परिचारिकांशी अेरेरावीची भाषा वापरणे तसेच वार्षिक गोपनीय अहवालाच्या (CR) माध्यमातून मानसिक त्रास देणे थांबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सकाळच्या बैठकीला उपस्थित राहण्याची सक्ती, सुट्टी नाकारणे तसेच रजेचे आणि इतर अर्ज आवक-जावक रजिस्टरमध्ये नोंदवून न घेण्याच्या प्रकारांवरही योग्य कार्यपद्धती निश्चित करण्याची मागणी आहे.

वैद्यकीय देयके मंजूर करताना होणारी अडवणूक अथवा पैशांची मागणी थांबवावी, १०, २० व ३० वर्षांच्या प्रगतीपथावरील आश्वासित प्रगती योजनेचा (CAS) लाभ देण्यास होणारा विलंब दूर करावा, अशीही संघटनेची मागणी आहे.

परिचारिकांना त्यांच्या मूळ कर्तव्याव्यतिरिक्त रुग्णवाहिका घेऊन जिल्हा रुग्णालयात पाठविणे तसेच OPD/IPD केसपेपर काढणे, रक्त संकलन आणि जन्म-मृत्यू प्रमाणपत्र तयार करण्यासारखी अतिरिक्त कामे सोपविणे थांबवावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

प्रशासकीय अन्याय, मनमानी आणि अतिरिक्त कामाचा वाढता ताण याचा परिणाम आरोग्यसेवेवरही होत असल्याने प्रशासनाने मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा RMBKSचे राज्यसचिव अमोलकुमार कवाणे यांनी दिला आहे.

१५ सप्टेंबर रोजी होणारे आंदोलन राज्यातील सर्व उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालयांसमोर होणार आहे.

सोयगावातील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.५ सप्टेंबर - ५ सप्टेंबर रोजी संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययन करून विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन साजरा केला या कार्यक्रमात ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यात प्रथम प्रतिक्षा पगारे,द्वितीय सायली कराळे,तृतीय सोहम शेट्टे या विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तेजस्विनीताई काळे या महाविद्यालयात उपस्थित होत्या तसेच महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.शिरीष पवार अध्यक्षस्थानी होते. कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,सुभाष पाटील,आर.टी.जाधव,ए.टी.मानकर,बी.ए.पाटील,तौफिक शेख,स्वाती देशमुख,अश्विनी काळे,योगेश काळे,कल्याणकर सर,विनोद चव्हाण,एस.के.कानडे,एस.बी.बुटुले,डी.पी.लिंबे, व महाविद्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते व मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

बिडकीन येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

बिडकीन, दि. ५ सप्टेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन व परिसरातील विविध धार्मिक स्थळांवर श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. बिडकीन येथील नवीन गावठाण परिसरातील जय भद्रा मारुती मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बालाजीनगर येथील पुरुष व महिला भजनी मंडळाच्या वतीने मध्यरात्रीपर्यंत भजनांचा कार्यक्रम घेण्यात आला. भजनी मंडळींनी श्रीकृष्णाच्या बालपणावर आधारित विविध गवळणी सादर करून उपस्थित भाविकांची मने जिंकली. श्रीकृष्णाच्या जयघोषाने परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

या कार्यक्रमात आत्माराम गायकवाड, बाबू डोखे, गोरख पवार, अरुण देविदास, किसन राठोड रहाटवाड, नितीन ठाणगे, बनकर, नामदेव रहाटवाड, नंदू होले, सुनील गोसावी तसेच महिला भजनी मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

भंगार गोळा करणाऱ्या हरीश थापा यांचा मृत्यू; पोलिसांनी केला अंत्यविधी

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०५ सप्टेंबर - शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जुन्या गोदामाच्या बोळीत एका व्यक्तीचा मृतदेह दि.०५ शनिवार रोजी आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. सकाळी ९ वाजेच्या सुमारास पाठीवर पडलेल्या अवस्थेत आढळलेल्या या व्यक्तीची पोलिसांनी तत्काळ ओळख पटवून दिली. हरीश थापा (वय ५०) असे मृत व्यक्तीचे नाव असल्याचे समोर आले.

हरीश थापा हे पाठीवर पिशवी घेऊन कन्नड शहरात भंगार गोळा करून उदरनिर्वाह करत होते. सकाळी ते कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जुन्या गोदामाच्या बोळीत पडलेल्या अवस्थेत आढळून आले. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी आरती पवार, पोलिस हेडकॉन्स्टेबल राजकुमार कुकलारे, पोलिस नाईक सुशिलकुमार बागुल आणि पोलिस अंमलदार कृष्णा माळी यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केला. मात्र, मृत व्यक्तीची ओळख पटलेली नसल्याने पोलिसांसमोर अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्याचे आव्हान होते. पोलिसांनी तत्काळ तपासाची सूत्रे हलवत परिसरात चौकशी सुरू केली. अखेर काही वेळातच मृताची ओळख हरीश थापा अशी पटविण्यात पोलिसांना यश आले. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, थापा हे कन्नड तालुक्यातील बनशेंद्रा परिसरातील एका हॉटेलवर काम करत होते. मात्र, काही दिवसांपूर्वी त्यांनी हे काम सोडले होते. त्यानंतर ते कन्नड शहरात भंगार गोळा करून आपला उदरनिर्वाह करत होते. दुपारी कन्नड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. सोहेल शेख यांनी थापा यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून. त्यानंतर मृतदेह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. हरीश थापा यांचे कोणतेही नातेवाईक उपलब्ध नसल्याने अखेर पोलिसांनी माणुसकीचे दर्शन घडवत त्यांच्या दफनविधीची जबाबदारी पार पाडली.

गोविंदा'च्या जयघोषात ब्लु माऊंटेन प्री स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

बिडकीन, दि. ५ सप्टेंबर - पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु माऊंटेन प्री स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांनी आणि 'गोविंदा'च्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या संचालिका सविता तोतला तसेच सर्व शिक्षिकांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित आकर्षक नृत्य सादर केले. तसेच 'कृष्ण-सुदामा' नाटक सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. राधा-कृष्णाच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी कार्यक्रमाची विशेष शोभा वाढवली. यावेळी संचालिका सविता तोतला यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा देत, "श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रेम, मैत्री, धैर्य आणि चांगल्या संस्कारांचे मूल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे," असे सांगितले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शाळेच्या प्रांगणात दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने दहीहंडी फोडून आनंद व्यक्त केला.

गोकुळाष्टमीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.५ सप्टेंबर-प्राथमिक शाळा रामजीनगर येथे गोकुळाष्टमी निमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेच्या वेशभूषेत सहभागी होत उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या बाललीलांवर आधारित गीते,नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. परिसरात 'गोविंदा आला रे!'च्या जयघोषाने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक,शिक्षक,यांनी आयोजन केले यावेळी व्यवस्थापन समिती अध्यक्ष,सदस्य माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष सदस्य,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गोकुळाष्टमीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगण्यात आले.मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

धरणात बुडालेल्या मनोज गायकवाड यांचा मृतदेह दुसऱ्या दिवशी आढळला

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०५ सप्टेंबर - हिवरखेडा (गौ.) गावाजवळ असलेल्या राम मंदिराच्या पाठीमागील धरणात पाण्यात बुडालेल्या मनोज काशिनाथ गायकवाड (रा. कन्नड) यांचा मृतदेह दुसऱ्या दिवशी दि.०५ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास अग्निशमन दलाच्या पथकाला आढळून आला. झाडीत अडकलेला मृतदेह बाहेर काढून कन्नड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला.

दि. ०४ रोजी मनोज गायकवाड हे राम मंदिराच्या पाठीमागील धरणाच्या परिसरात गेले होते. बराच वेळ उलटूनही ते घरी परतले नाहीत. त्यामुळे त्यांचा पुतण्या दिनेश गायकवाड त्यांचा शोध घेण्यासाठी धरणाजवळ गेला. यावेळी धरणाच्या काठावर मनोज यांचे कपडे दिसून आले त्याने शोधाशोध केली पण ते मिळून आले नाही. यामुळे दिनेशने तातडीने घरी येऊन वडिलांना याबाबत माहिती दिली.यानंतर नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेत मनोज यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, रात्रीची वेळ असल्याने अंधारामुळे शोधमोहीम राबविण्यात अडचणी येत होत्या. घटनेची माहिती कन्नड शहर पोलिसांना देण्यात आली.

माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक त्रिलोकचंद पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली.

रात्री शोधमोहीम थांबविल्यानंतर सकाळी पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात आले. यासाठी छत्रपती संभाजीनगर येथून अग्निशमन दलाचे पथक पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी धरणाच्या पाण्यात शोधमोहीम राबविली. अखेर शनिवार रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास बेशरमाच्या झाडीत मनोज गायकवाड यांचा मृतदेह आढळून आला.

अग्निशमन दलाच्या जवानांनी मृतदेह पाण्यातून बाहेर काढला. त्यानंतर तो कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला. वैद्यकीय अधिकारी डॉ. सोहेल शेख यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन केला. या शोधमोहीमेत पोलिस उपनिरीक्षक त्रिलोकचंद पवार, केशरसिंग जारवाल, पोलिस अंमलदार विजय चौधरी, सागर सुलाने तसेच अग्निशमन दलाचे ड्युटी प्रभारी संदीप चव्हाण, फायरमन अक्षय नागरे, सचिन शिंदे, विनोद दमने, सचिन फुले, दिनेश मुंगसे, मतीन शेख, वाहनचालक नंदकिशोर घुले, यांच्यासह कन्नड नगरपरिषदेचे पथक निलेश पाटील,रेहान शेख,अंकुश धनेधर, सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी सांभाळली शाळेची धुरा; ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात

तभा वृत्तसेवा

बिडकीन, दि. ५ सप्टेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांद्वारे शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला तसेच शिक्षकांच्या हस्ते भारताचे माजी राष्ट्रपती व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे तसेच विविध नृत्य सादरीकरणे करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते शाळेतील शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे शाळेचे संपूर्ण दैनंदिन कामकाज विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाती घेतले. विद्यार्थ्यांनी संचालक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक तसेच विविध विषयांचे शिक्षक अशा भूमिका साकारत इतर विद्यार्थ्यांना अध्यापन केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षकांची जबाबदारी, शिस्त, नियोजन आणि नेतृत्वगुण यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांच्या या अभिनव उपक्रमाचे शिक्षक व उपस्थितांनी कौतुक केले. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

वाहतूक नियमांबाबत जनजागृतीसाठी सोयगाव पोलीस ठाण्यातर्फे चित्रकला स्पर्धा संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.५ सप्टेंबर

विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती व्हावी तसेच सुरक्षिततेचा संदेश चित्रकलेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचावा,या उद्देशाने सोयगाव पोलीस ठाण्याच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी 'वाहतूक नियम पाळू या, अपघात टाळू या' तसेच 'हेल्मेट व सीट बेल्ट जीवनाचे सुरक्षा कवच' हे विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आकर्षक चित्रे साकारत वाहतूक सुरक्षिततेचा प्रभावी संदेश दिला.

स्पर्धेत प्रथम क्रमांक वेदांत शरद पवार (जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव) याने मिळविला. द्वितीय क्रमांक सपना राठोड (कै. वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय,निबायती तांडा) हिने,तर विभागून द्वितीय क्रमांक अक्षरा दयानंद पवार (जिल्हा परिषद प्रशाला,सोयगाव) हिने पटकावला.तृतीय क्रमांक पूजा संजय पाटील (जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव) हिने मिळविला.

या विजेत्या विद्यार्थ्यांचा सोयगाव पोलीस ठाण्यात शुक्रवार रोजी सत्कार करण्यात आला.यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे व कृषिभूषण अरुण सोहनी यांच्या शुभहस्ते विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

यावेळी पोलीस कर्मचारी गजानन दांडगे,पालक शरद पवार,वैशाली पवार,मुख्याध्यापक हरिदास काटोले,भास्कर चौधरी,किरणकुमार पाटील, रामचंद्र महाकाळ,विवेक महाजन यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांचे महत्त्व, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण झाली. सोयगाव पोलीस ठाण्याच्या या सामाजिक उपक्रमाचे पालक व नागरिकांनी कौतुक केले.

भगवती विद्यालय बिडकीन येथे डॉ सर्वपल्लीन राधाकृष्णन यांची जयंती उत्सवात साजरी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ५ सप्टेबर : भगवती विद्यालय, बिडकीन येथे डॉ. सर्वपल्लीन राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम शाळेचे मुख्याध्यापक रायभान रक्ते यांच्या व विद्यार्थी शिक्षक यांच्या हस्ते राधाकृष्ण यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले.त्यांच्या जीवनावर सर्व शिक्षकवृंदाणी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचा पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला.

शाळेतील रिबीका नाडे, अनिशा माळी, सना सय्यद अरबीना पठाण, प्रीती जाधव, रुक्कया शेख, सुमय्या शेख जिनत शहा, आरती भालेकर, शर्वरी निकाळजे शोएब शेख, यांनी सह शिक्षक म्हणून काम पहिले. ते समीर शेख, स्वप्नील कीर्तिकर यांनी शिपाही म्हणून काम पहिले. मुख्याध्यपकांनी डॉक्टर राधाकृणन यांचे जीवन कसे होते मांडले व विद्यार्थ्यांनी कसे आत्मसात करावे हे सांगून त्यांच्यापासून आपण प्रेरणा ग्यावी सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग दहावीची विद्यार्थिनी रिबीका नाडे हिने केले तर आभार सुनील पवार यांनी मानले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीधर जऱ्हाड, कमलाकर काळे , अप्पासाहेब किसवे, रामनाथ धनवे श्रीमती विश्रांती सलगरे, आशुतोष झारगड, यांनी सहकार्य केले. पसायदानणे कार्यक्रमाची सांगता झाली.

ई-सूची ॲपद्वारे जिल्ह्यात आरोग्य सेवांचे डिजिटलायझेशन

27 लाख कुटुंबांचे सर्वेक्षण; 16 हजार गरोदर मातांची नोंदणी; 3 लाख नवीन ABHA निर्मिती

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : जिल्ह्यातील नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक, गतिमान आणि आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'ई-सूची' ॲपच्या माध्यमातून आरोग्य सेवांचे डिजिटलायझेशन सुरू करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

'ई-सूची' ॲपच्या माध्यमातून कुटुंब सर्वेक्षण, माता व बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, लसीकरण, असंसर्गजन्य आजार, क्षयरोग आदी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांशी संबंधित माहिती डिजिटल पद्धतीने नोंदविण्यात येत आहे. त्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध होण्यास मदत होत आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत २७ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण, १६ हजार गरोदर मातांची नोंदणी करण्यात आली असून, ई-सूची ॲपच्या माध्यमातून ३ लाख नवीन ABHA (आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट) निर्मिती करण्यात आली आहे. कुटुंब सर्वेक्षण, कुटुंब नियोजन तसेच माता व बाल आरोग्य कार्यक्रमांची डिजिटल नोंदणी पूर्ण झाली असून, लसीकरण, असंसर्गजन्य आजार आणि क्षयरोग आदी कार्यक्रमांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे.

यापुढील काळात ABHAच्या माध्यमातून ई-सूची ॲपला विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या डिजिटल प्रणालीशी जोडण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांची आरोग्यविषयक माहिती अधिक सुसूत्र पद्धतीने उपलब्ध होऊन सेवा वितरण, लाभार्थींचा मागोवा आणि आरोग्य कार्यक्रमांचे नियोजन अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे.

या डिजिटल प्रणालीमुळे कागदी नोंदीवरील अवलंबित्व कमी होऊन वेळेची बचत, माहितीचे अचूक व्यवस्थापन, आरोग्य सेवांमध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच उपलब्ध आरोग्य सुविधांचे नियोजन, निरीक्षण व आढावा घेणे अधिक सुलभ होणार आहे.

ग्रामीण तसेच शहरी भागात ई-सूचीच्या माध्यमातून कुटुंब सर्वेक्षण आणि ABHA निर्मितीचे काम आशा कार्यकर्त्यांमार्फत सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आशा कार्यकर्त्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

जाहिर प्रगटन

मा. विदयमान प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब सोयगांव यांचे न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज क्रं. ५६/२०२६. नि. क्रं.
रितेश संजय गव्हांडे, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सावरखेडा, ता. सोयगांव, जि. छ.संभाजीनगर.
विरुद्ध.
ग्रामसेवक, गृप-ग्रामपंचायत कार्यालय सावरखेडा/लेनापुर, ता. सोयगांव, जि. छ.संभाजीनगर.
प्रकरण :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९, अन्वये
सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९, अन्वये जन्म नोंद आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नामे रितेश संजय गव्हांडे याचा जन्म दिनांक २७/०३/२००८ रोजी मौजे सावरखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे झालेला असुन अज्ञानामुळे जन्माची नोंद तत्कालीन वेळेत गृप-ग्रामपंचायत कार्यालय सावरखेडा/लेनापुर येथे झालेली नाही. त्यामुळे जन्म नोंद आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.
तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या अर्जास उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जावर योग्य ते आदेश पारीत केल्या जाईल याची नोंद असु दयावी.
आजरोजी दिनांक १/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु.ता. १४/१०/२०२६.
आदेशावरुन
विभीगीय लिपीक सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव

जाहिर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १८३/२०२६. नि. क्रं.
१. नारायण रावजी घनगांव, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. प्रभाकर रावजी घनगांव, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगाव जि. छ. संभाजीनगर
विरुद्ध.
निल
प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत
सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत शेवंताबाई रावजी घनगांव यांचा दिनांक २७/०७/२०२६ रोजी सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्रं. १ व २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत शेवंताबाई रावजी घनगांव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.
तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.
आजरोजी दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु.ता. ६/१०/२०२६
आदेशावरुन
विभीगीय लिपीक सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

अग्रलेख

विद्येच्या माहेरचा ‘शस्त्रार्थ’

पुणे शहराला महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते. या शहराला विद्येचे माहेरघर किंवा ऑक्सफर्ड ऑफ दि इस्ट असेही म्हणतात. स्वातंत्र्यलढा, राजकारण, समाजसुधारणा, साहित्य, कला, संस्कृती, क्रीडा, विज्ञान अशा अनेकानेक क्षेत्रांत पुण्याचा इतिहास देदीप्यमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून महात्मा फुले, लोकमान्य टिळक, महर्षी कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, पु. ल. देशपांडे ते आजच्या काळातील अनेक मान्यवर अशी ही थोर परंपरा. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात वंचित वर्गाला द्यावयाच्या प्रतिनिधित्वाविषयी ज्या शहरात शास्त्रार्थ झाला, ते शहर म्हणजे पुणे. टिळक-आगरकरांचा शास्त्रार्थ याच शहरात घडला. त्याच शहरात आता ‘शास्त्रार्था’ऐवजी ‘शस्त्रार्था’चे रंग गहिरे होऊ लागले आहेत. गुन्हेगारी व हिंसाचार वाढतोच आहे; शिवाय छोट्या विषयांवरूनही हिंसा घडू लागली आहे. ताजे उदाहरण उत्सवात डीजे वापरण्यास विरोध करणारे सामान्य नागरिक विद्यानंद बापट यांना झालेल्या मारहाणीचे. भारतीय समाज बहुरंगी आणि बहुढंगी आहे. एरवी त्याचाच आपण विविधतेतील एकता वगैरे म्हणत ढोल बडवितो. पण, डीजेचा गोंगाट नको म्हणणारे एखादे बापट आपल्याला चालत नाहीत हे नवलच म्हटले पाहिजे.

भारतीय संस्कृतीत मतभेदांना नेहमीच स्थान राहिले आहे. आपली संस्कृती कमालीची सर्वसमावेशक आहे. ईश्वरावर विश्वास ठेवणारे, न ठेवणारे हे सारे एकाच ईश्वराचे अंश आहेत आणि त्यामुळे ते सारे आपलेच आहेत, असे मानणारी आपली संस्कृती. चार्वाकाचा भौतिकवाद हा देखील एक विचार आहे, हे मान्य करणारी आपली परंपरा. आपल्या संस्कृतीने चार्वाक किंवा अन्य समांतर विचारधारांना धर्मविरोधी म्हणून नष्ट केले नाही. उलट आपल्यातील एक विचारप्रवाह म्हणून त्यांना आदराचे स्थान दिले. हजारो वर्षांपासून शास्त्रार्थ आणि खंडन-मंडन यांची परंपरा भारतात अक्षुण्ण राहिली. आधुनिक काळात भारतीय समाजाच्या वैचारिक परंपरेचे प्रतिनिधित्व आपली राज्यघटना करते. त्या घटनेतही अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी आहे. तीच राज्यघटना कलम २१ प्रमाणे आपल्या सर्वांना प्रतिष्ठित-सुखमय जीवनाचा अधिकार देते. २१ व्या कलमाच्या तरतुदींमध्ये नागरिकांना सन्मानाने व शांतपणे जगण्याचा अधिकार अनुस्यूत आहे. खाजगीपणा (प्रायव्हसी) राखण्याचा अधिकार, स्वच्छ पर्यावरणात आरोग्यदायी जीवन जगण्याचा अधिकार, उपजीविकेचा अधिकार असे विविध प्रकारचे अधिकार राज्यघटनेने नागरिकांना बहाल केलेले आहेत. २००५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एक निकाल दिला होता. ध्वनिप्रदूषणमुक्त वातावरणात जगणे हाही शांततेत जगण्याच्या अधिकाराचा भागच होय, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला संपूर्ण भारतासाठी कायद्याचा दर्जा असतो. बापट यांची मागणी किंवा आवाहन त्या कायद्याच्या बाहेरचे नाही. त्यांच्यावर हल्ला करणाऱ्यांच्या व त्या हल्ल्याचे समर्थन करणाऱ्यांच्या आकलनात चूक आहे, असे दिसते. खरा प्रश्न इथे डीजेचा नाही. खरा प्रश्न आहे तो इतरांच्या जगण्याच्या अधिकाराचा आदर करण्याचा. मला उत्सव साजरा करण्याचा अधिकार जसा आहे, तसाच दुसऱ्याला शांततेत जगण्याचा अधिकार आहे, हे मान्य करण्याचा हा प्रश्न आहे. माझ्या आनंदाचा आवाज इतरांना त्रासदायक ठरत असेल तर त्या आनंदाला पावित्र्य उरत नाही, हे न समजण्याचा हा मुद्दा आहे. भारतीय सणांना आता जे स्वरूप आले आहे, तो काळाचा महिमा असला तरी त्यातले सगळेच चांगले किंवा वाईट असे सरसकट म्हणता येत नाही. व्यापक समाजहितासाठी कोणत्याही गोष्टीत बदल करणे ही आपलीच परंपरा आहे. उत्सव हे भारतीय समाजजीवनाचे अविभाज्य अंग आहेत. आनंद व्यक्त करण्यासाठी एकत्र येणे, परंपरा जपणे, देवदेवतांची आराधना करणे, मिरवणुका काढणे, संगीत व नृत्य करणे याला आपल्या संस्कृतीत मोठे स्थान आहे. मात्र, उत्सवाच्या आनंदाचे रूपांतर उन्मादात होत असेल आणि इतरांना त्रास होत असेल तर आपल्या सणांच्या संदर्भातील मूळ विचार मागे पडतात, हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

एखाद्याने कायद्याच्या चौकटीत राहून प्रश्न उपस्थित केला की त्याला उत्तर देण्याऐवजी त्याची टवाळी करणे किंवा त्याला मारहाण करणे हे फक्त एका व्यक्तीच्या अवमानापुरते मर्यादित कृत्य नाही. तो समाजाच्या वैचारिक अधःपतनाचा संकेत आहे. बापट यांनी युक्तिवाद केला. त्यांना युक्तिवादाने उत्तर देता येणे शक्य आहे. त्यांच्या साऱ्याच वक्तव्यांचे समर्थन करता येत नाही. पण, त्यांना झालेल्या मारहाणीचेही समर्थन होऊ शकत नाही. युक्तिवादाला गुद्द्याने उत्तर द्यावे लागत असेल तर आपण शास्त्रार्थ सोडून शस्त्रार्थाच्या दिशेने निघालो आहोत, असेच म्हणावे लागेल. पुण्याची अस्मिता आणि ओळख विद्या, शास्त्रार्थ आणि पुरुषार्थाशी जोडलेली आहे. मतभेद कसे मांडायचे, विरोध कसा करायचा आणि तर्काच्या आधारे भूमिका कशी सिद्ध करायची, याचे अनेक दाखले पुण्याच्या इतिहासात सापडतात. तो शास्त्रार्थ बाजूला पडून शस्त्रार्थाचाच बोलबाला होऊ लागतो तेव्हा साऱ्याच शहरांनी आपल्या इतिहासात डोकावून पाहिले पाहिजे. आपले समाजजीवन नेमक्या कोणत्या दिशेने चालले आहे, याचा धांडोळा घेतला पाहिजे. शास्त्रार्थात पराभव झाला तर पुन्हा विचार करता येतो. मात्र, शस्त्रार्थात अनिष्ट प्रवृत्तींचा विजय झाला तर समाजाचा पराभव होतो. कारण दहशतीच्या वातावरणात विचार मांडण्याची हिंमतच कमी होत जाते आणि भयमुक्त लोकशाहीच्या पायाला धक्का लागत असतो. आज विद्यानंद बापट आहेत. उद्या दुसरा कोणी असेल. आज प्रश्न डीजेचा आहे, उद्या तो रस्त्यावरील अतिक्रमणाचा असेल, प्रदूषणाचा असेल, वाहतुकीचा असेल किंवा एखाद्या सामाजिक विषयाचा असेल. प्रश्न विचारणाऱ्या प्रत्येक नागरिकाला ‘तू कोण हे बोलणारा?’ असे विचारले जाणार असेल, तर लोकशाहीतील नागरिकत्वाच्या अधिकारांना अर्थच उरणार नाही. भारतीय नागरिकाला प्रश्न विचारण्यासाठी राजकीय पक्षातील पद, संघटनेचे सदस्यत्व किंवा कोणत्याही नेत्याचे पाठबळ लागत नाही. नागरिक असणे एवढीच पात्रता पुरेशी आहे. बापट यांची पात्रता त्यामुळे फक्त नागरिक म्हणून प्रश्नातीत आहे. त्यांच्यासारखा तर्क करता न येणारे लोक युक्तिवादापासून पलायन करीत आहेत आणि हिंसेचा आधार घेत आहेत. विचार चुकीचा असेल तर खोडून काढलाच पाहिजे. तसे न होता फक्त मारहाण करण्याचे समर्थन होऊ शकत नाही. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात मतभेद व्यक्त करण्याच्या संदर्भात असे वातावरण निर्माण होत असेल तर ते योग्य नाही. विद्या केवळ पदवी मिळवून देत नसते. विद्या ही माणसाला असहमतीचा स्वीकार करण्याची ताकद देते. ती माणसाला सहनशील व समंजस बनविते. आपल्याला न पटणारे ऐकून घेणे, स्वतःची भूमिका तपासणे आणि गरज पडल्यास ती बदलणे हीच खरी विद्वत्ता असते. ज्याला प्रत्येक विरोधक शत्रू वाटतो, त्याने कितीही पुस्तके वाचली असली तरी त्याच्यात विद्येचा संस्कार किती उतरला, हा प्रश्न उरतोच. त्यामुळेच पुण्याने आणि त्याच्यापाठोपाठ अन्य शहरांनी देखील भारतीय संस्कृतीचा आदर करीत चर्चेची, शास्त्रार्थाची परंपरा पुन्हा जिवंत केली पाहिजे. पुण्याच्या इतिहासात ‘शास्त्रार्थ’ हा शब्द केवळ धार्मिक किंवा तात्त्विक चर्चेपुरता मर्यादित नव्हता. तो व्यापक सार्वजनिक संस्कृतीचा भाग होता. तर्काचा सामना प्रतितर्काने व्हायचा. मतभेदांतून नवे विचार जन्माला यायचे. त्याच परंपरेचे पुनरुज्जीवन आज पुण्याला नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी आवश्यक आहे. लोकतांत्रिक समाजाची खरी ताकद सर्वांनी एकसारखा विचार करण्यात नसते. सर्वांनी वेगळे विचार करूनही एकत्र राहण्यात असते. भारत हजारो वर्षे विविध विचार, पंथ, उपासना, तत्त्वज्ञान आणि जीवनपद्धती यांना सामावून घेत टिकला, याचे कारण मतभेदांचा अभाव नव्हे; तर मतभेदांसह जगण्याची आपली क्षमता हेच होते. आज त्या क्षमतेचीच कसोटी आहे... अर्थात आपल्या सर्वांचीच परीक्षा आहे. ■

प्रासंगिक

शिक्षक : समाजमन घडवणारे भविष्याचे शिल्पकार

द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती

शिक्षक विद्यार्थ्यांचे भवितव्य साकारत असतात. या शिक्षक दिनानिमित्त, सर्व भारतीयांच्या वतीने, मी अशा सर्व शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करते जे आपल्या कोट्यवधी विद्यार्थ्यांचे जीवन ज्ञान, कौशल्ये, मूल्यांनी परिपूर्ण करतात आणि त्यांना प्रेरित करतात. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची अशी इच्छा होती की, त्यांचा जन्मदिवस ‘शिक्षक दिन’ म्हणून साजरा केला जावा, हे सर्वश्रुत आहे. ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विद्वान, प्रसिद्ध लेखक आणि आदरणीय मुत्सद्दी होते; मात्र तरीही त्यांनी शिक्षक म्हणून आपल्या भूमिकेला इतर सर्व भूमिकांपेक्षा सर्वांत महत्त्वाचे मानले. भारताचे एक अत्यंत लाडके माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना एकदा विचारण्यात आले होते की, लोक त्यांना वैज्ञानिक म्हणून अधिक लक्षात ठेवतील की राष्ट्रपती म्हणून? त्यावर डॉ. कलाम यांनी उत्तर दिले होते की, त्यांना एक शिक्षक म्हणून आठवणीत राहायला आवडेल.

ज्यांचे कौशल्य आणि चारित्र्य त्यांना वंदनीय बनवते आणि त्यामुळे ज्याच्याप्रति समस्त विद्यार्थी समर्पित असतात असे शिक्षक नेहमीच आपले आदर्श राहिले आहेत. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांवर स्वतःच्या मुलांप्रमाणे प्रेम केले पाहिजे, त्यांनी सर्वांना समान आणि न्याय्य वागणूक दिली पाहिजे, अशी आपल्या प्राचीन ग्रंथांची शिकवण आहे. सुमारे तीन सहस्र वर्षांपूर्वी तैत्तिरीय उपनिषदातील ‘शिक्षावल्ली’ने ‘आचार्यदेवो भव’ हा कालातीत संदेश दिला होता. अनेक ज्ञानी आणि अतिशय आपुलकीने मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभणे हे माझे परमभाग्य राहिले आहे. आमचे शिक्षक शाळेच्या वेळेनंतरही काही वेळा, त्यांच्या घरी आम्हाला शिकवायचे आणि आमची खूप काळजी घ्यायचे. सातवीची शाळा पूर्ण केल्यानंतर, पुढील शिक्षणासाठी गावाबाहेर पडणारी मी पहिली मुलगी होते. नंतर भुवनेश्वरमध्ये शिकत असतानाही, मला माझ्या शिक्षकांकडून उदंड प्रेम आणि प्रोत्साहन मिळण्याचे सौभाग्य लाभले. मी माझ्या शिक्षकांचा उल्लेख येथे अत्यंत नम्रतेने करत आहे, कारण त्यांची कथा एका सखोल सत्याचे दर्शन घडवते : एक प्रेमळ आणि समर्पित शिक्षक विद्यार्थ्यामध्ये असीम क्षमता आणि प्रेरणा जागृत करू शकतो. त्यांच्या या प्रोत्साहनाने बळकट होऊन, विद्यार्थी आयुष्यातील कठीण आव्हानांना तोंड देण्याचे धैर्य आणि सर्वोच्च ध्येये गाठण्याचा आत्मविश्वास विकसित करतात. शिक्षक आपल्या स्वतःच्या आचरणातून आणि उदाहरणातून, ते एक यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेली कला आणि कौशल्य यांनी विद्यार्थ्यांना संपन्न बनवतात. मार्गदर्शक असण्यासोबतच, शिक्षक हा विद्यार्थ्याच्या ज्ञानार्जनाच्या प्रवासातील एक शुभचिंतक, मित्र आणि सहप्रवासीसुद्धा असतो.

‘एक चांगला शिक्षक कसा असावा’ याविषयी प्राचीन काळापासून आपल्या संस्कृती आणि परंपरेतून मिळालेला हा दृष्टिकोन आजही तितकाच प्रासंगिक आहे. अनेक शतकांपूर्वी महाकवी कालिदासांनी त्यांच्या ‘मालविकाग्निमित्रम्’ या नाटकात लिहिले आहे की, चांगला शिक्षक तोच असतो ज्याच्याकडे सखोल ज्ञान असते आणि ते ज्ञान प्रभावीपणे संक्रमित करण्याची क्षमताही असते. संस्कृतमधील एक प्रसिद्ध सुभाषित आपल्याला सांगते : ‘सर्वत्र विजयम् इच्छेत्, शिष्यात् इच्छेत् पराजयम्’ - माणसाने सर्वत्र विजयाची इच्छा बाळगावी, परंतु स्वतःच्या शिष्याकडून मात्र पराभूत होण्याची इच्छा ठेवावी. विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र विचारांना प्रोत्साहन देणे, त्यांची उत्सुकता प्रज्वलित करणे, प्रश्न विचारण्याच्या वृत्तीला खतपाणी घालणे, त्यांची तर्क आणि निर्णयाची क्षमता तीक्ष्ण करणे आणि त्यांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून घडण्यास मदत करणे हे अध्यापनाचे सर्वांत उपयुक्त आणि सन्माननीय पैलू आहेत. अध्यापन हा केवळ एक व्यवसाय नाही; तर ते एक व्रत आहे. ही केवळ एक कारकीर्द किंवा नोकरी नाही; तर मानवतेला आकार देण्याचे एक पवित्र कार्य आहे. येणाऱ्या पिढ्यांचा मार्ग प्रकाशित करण्याची ही एक उदात्त जबाबदारी आहे. अध्यापनाशी जोडलेल्या माझ्या आठवणी मला एका विशेष समाधानाची अनुभूती देतात. मी ओडिशातील रायरंगपूर येथील श्री ऑरोबिंदो इंटेग्रल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शिकवले आहे. विविध विषय शिकवण्याव्यतिरिक्त मुलांचे संगीत कार्यक्रम, क्रीडा उपक्रम आणि नाटकांच्या तयारीसाठी पूर्णपणे मदत करत असे. आजही स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यांची आमची तयारी आणि कार्यक्रमांदरम्यान मुलांमधील आनंदी उत्साहाच्या आठवणी माझ्यासाठी अतिशय सुखावह असतात. विद्यार्थ्यांना सुंदर नैसर्गिक वातावरणात सहलीला नेण्यात आणि खेळ तसेच शोधाच्या माध्यमातून त्यांना प्राणी, पक्षी, झाडे आणि वनस्पतींच्या जगाची ओळख करून देण्यात मला खूप समाधान लाभले आणि जीवनाचा अर्थ सापडला. शाळा सोडल्यानंतर अनेक वर्षांनीही माझे विद्यार्थी मला त्यांच्या कौटुंबिक कार्यक्रमांना आदरपूर्वक आमंत्रित करतात. मला माझ्या अनेक विद्यार्थ्यांची नावेच नव्हे, तर आम्ही ज्या टोपणनावांनी त्यांना प्रेमाने हाक मारायचो ती टोपणनावेही आठवतात.

राष्ट्रपती म्हणून माझ्या कार्यकाळाचे दुसरे वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, मी राष्ट्रपती भवनाच्या परिसरात असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवला आणि त्यांना पर्यावरण संरक्षणाविषयी शिकवले. विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी आणि त्यांचे विचार व कल्पना समजून घेण्यासाठी मी नेहमीच उत्सुक असते. साधारण ११ वर्षांपूर्वी, मी माझ्या गावच्या घरी एका निवासी शाळेची स्थापना केली. या शाळेत वंचित कुटुंबांतील विद्यार्थी आणि ज्यांनी आपले आई-वडिलांचे छत्र गमावले आहे अशी बालके शिक्षण घेतात. मी वेळोवेळी या बालकांना भेटण्यासाठी या शाळेला भेट देत असते. यावर्षी, २० जून रोजी माझ्या वाढदिवसाच्या दिवशी या बालकांना भेटून मला खूप आनंद झाला. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांनीही माझ्यासोबत शाळेला भेट दिली आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. त्यांना भेटण्याचा हा असाधारण अनुभव या विद्यार्थ्यांसाठी कायमस्वरूपी प्रेरणास्त्रोत बनेल. त्या मुलांना प्रगती करताना पाहून माझ्या मनात एका विशेष अर्थपूर्णतेची भावना निर्माण होते.

शिक्षण देण्याचे कार्य ही केवळ शिक्षकांची एकट्याचीच जबाबदारी नाही. जे लोक आपल्या आचरणातून आणि कर्तृत्वातून मुलांसाठी आदर्श बनतात, तेसुद्धा शिक्षण आणि प्रेरणेचा एक मौल्यवान स्रोत असतात. पालक आणि पालकवर्ग जेव्हा आपल्या मुलांना शिकण्यासाठी पाठवतात, तेव्हा शिक्षकांवर त्यांचा सर्वाधिक विश्वास असतो. शिक्षक आपल्या मुलांना स्वतःचे मानतील आणि मुलांच्या सुरक्षेची व विकासाची पूर्ण काळजी घेतील, असा त्यांचा विश्वास असतो. पालकांच्या या पवित्र विश्वासाचे जतन करणे हे प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य आहे. शिक्षकाची वृत्ती, आचरण आणि वर्तनामुळे मुलांमध्ये भीती आणि चिंता निर्माण होऊ नये, त्यांचे खच्चीकरण होऊ नये किंवा त्यांच्यात कोणतीही न्यूनगंडाची भावना निर्माण होऊ नये. चांगले शिक्षक त्यांच्या विद्यार्थ्यांना सर्वोत्तम व्यक्ती बनण्यास मदत करतात. आपल्या विद्यार्थ्यांना एक चांगला माणूस बनवण्यासाठी मार्गदर्शन करणे हे शिक्षकांचे पवित्र कर्तव्य आहे. जे विद्यार्थी आपल्या विचारांत आणि कृतीत नैतिक राहून समृद्धी आणि यश संपादन करतात, ते शिक्षकांच्या यशाचे जिवंत प्रतीक असतात. आपला देश सामाजिक समावेशनाला केंद्रस्थानी ठेवून विकसित भारत बनण्याच्या ध्येयाकडे एका निश्चित गतीने वाटचाल करत आहे. या प्रवासात आपण पुढे जात असताना, आपल्या शिक्षकांनी अशा विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडवाव्यात, ज्या आपल्या सांस्कृतिक वारशाच्या आणि परंपरेच्या समृद्धीला जपतील; वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करतील आणि मानवतेच्या कल्याणासाठी कार्य करतील; ‘अंत्योदय’च्या आदर्शाचे पालन करतील; पर्यावरण आणि सर्व सजीवांचे रक्षण करतील; वैयक्तिक आणि सामूहिक उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करतील आणि ‘राष्ट्र प्रथम’च्या भावनेने पुढे जातील. मी प्रत्येक नागरिकाला एक आवाहन करते की आपल्या ध्येयासाठी वाहून घेतलेल्या आणि अतिशय प्रामाणिक असलेल्या शिक्षकांचा नेहमीच आदर करा. अशा प्रकारच्या ध्येयनिष्ठ शिक्षकांच्या योगदानामुळे भारत शिकत राहील आणि जगाचे नेतृत्व करत राहील, अशी मी मनापासून कामना करते. ■

वेध

विजय कुळकर्णी

‘एनसीएमसी’ची सवलत आणि प्रवाशांना फटका

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी)ची १ सप्टेंबरपासून अंमलबजावणी सुरू केली. मात्र, त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. ही केवळ तांत्रिक अडचण म्हणून दुर्लक्ष करण्याजोगी बाब नसून सामाजिक दृष्टिकोनातून पाहता ही योजना अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेच्या लाभ देण्या-घेण्यातच अडथळे निर्माण होत असल्यास शासनाच्या चांगल्या योजनांची अंमलबजावणी नेमकी कोठे कमी पडते, असा प्रश्न उपस्थित होतो. या योजनेंतर्गत ५० टक्के प्रवास सवलत असलेल्या महिला, मोफत प्रवास सवलत असलेले ज्येष्ठ नागरिक इत्यादी सर्व प्रवास सवलतीच्या लाभार्थी प्रवाशांनी एनसीएमसी कार्ड काढले. त्यावर विश्वास ठेवून प्रवासाचे नियोजन केले. प्रवासासाठी बसमध्ये आसनस्थ झाल्यानंतर प्रवाशांना त्यांचे कार्ड अद्ययावत नसल्याचे सांगण्यात आले. एवढेच नव्हे तर, प्रवाशांना बसमधून उतरण्यास सांगण्यात आले. ही बाब विशेषतः ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी मोठी त्रासदायक ठरली. खामगाव येथील बस स्थानकावर हा प्रकार घडला. ज्येष्ठ नागरिकांसाठी हा प्रकार अतिशय त्रासदायकच आहे. त्यांचे वय, शारीरिक क्षमता आणि प्रवासातील अडचणी लक्षात घेऊनच त्यांच्यासाठी ही मोफत प्रवासाची सुविधा महाराष्ट्र सरकारने सुरू केली. अशा प्रवाशांना सामानासह बसमधून उतरणे, पुन्हा स्थानकात थांबून दुसऱ्या बसची वाट पाहणे किंवा प्रवासाची पर्यायी व्यवस्था करणे, हा त्यांच्या प्रवास सवलतीच्या अधिकाराचा योग्य सन्मान नाही. ज्या ज्येष्ठ लाभार्थींसाठी सुविधा सुरू करण्यात आली त्यांनाच जर अशाप्रकारे त्रास व मनस्ताप सहन करावा लागत असेल तर योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होणे साहजिकच आहे.

महिलांसाठी ५० टक्के प्रवास सवलत ही शासनाच्या विविध योजनांपैकी महत्त्वाची योजना आहे. या सुविधेच्या लाभार्थी महिलांची संख्या खूप मोठी आहे. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांसाठी एस. टी.चा प्रवास दैनंदिन जीवनाची आवश्यकता आहे. बाजारपेठ, दवाखाना, शासकीय कार्यालयात जाणे, शिक्षण, नोकरी किंवा कौटुंबिक कारणांसाठी त्यांना प्रवास करावा लागतो. अशा लाभार्थींचे कार्ड स्वीकारले नाही तर, त्या प्रवास सवलतीस पात्र असूनही त्यांना त्या प्रवास सवलतीचा लाभ मिळणार नाही. तंत्रज्ञानाचा वापर करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ, पारदर्शक आणि गतिमान करणे, हा शासनाचा उद्देश असतो. एनसीएमसी कार्ड हे त्याच दिशेने टाकलेले पाऊल आहे. मात्र, तंत्रज्ञानामुळे सुविधा मिळण्याऐवजी प्रवाशांची डोकेदुखी वाढली तर, अशा तंत्रज्ञानाचे करायचे काय, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. तेव्हा, या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीचा पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. कार्ड अद्ययावत नाही, प्रणालीत माहिती दिसत नाही, मशीन कार्ड स्वीकारत नाही, अशा कारणांमुळे प्रवाशांना शिक्षा मिळता कामा नये. त्यामुळे एस. टी. प्रशासनाची जबाबदारी येथे अधिक वाढते. कार्डधारक प्रवाशांची माहिती वेळेवर अद्ययावत करण्यासाठी नियमित मोहीम राबविणे, कार्डमध्ये अडचण असल्यास बस स्थानकावरच त्या दूर करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.,चालक-वाहकांना स्पष्ट सूचना देणे आवश्यक आहे. एखाद्या प्रवाशाचे कार्ड अद्ययावत नसल्यास त्याला पर्यायी व्यवस्थेने प्रवास सवलत सुविधा उपलब्ध करून देण्याची तातपुरती व्यवस्था करता येऊ शकते का? यावर एस. टी. महामंडळाने विचार केला पाहिजे. प्रवाशांना नियमांची माहिती असली पाहिजे, हे खरे पण, त्याचवेळी नियमांची अंमलबजावणी करताना मानवी दृष्टिकोनही तितकाच महत्त्वाचा ठरतो. ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांच्याबाबतीत संवेदनशीलता अपेक्षित आहे. तांत्रिक बिघाड हा प्रवासी किंवा कर्मचाऱ्यांचा दोष नसतो. पण, त्याचा संपूर्ण भार प्रवाशांवर टाकणे अन्यायकारकच नाही का? खामगाव बस स्थानकातील ही घटना हा भविष्यासाठी एक इशारा समजण्यास हरकत नाही. त्यावरून आज काही प्रवाशांची गैरसोय झाली. उद्या ही समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकते. तेव्हा, संबंधित यंत्रणेने केवळ त्या दिवसाच्या तक्रारींवर पडदा न टाकता एनसीएमसी कार्ड प्रणालीची प्रत्यक्ष तपासणी केली पाहिजे.

शासकीय योजना कागदावर आकर्षक असण्यापेक्षा त्या प्रत्यक्ष प्रवाशांपर्यंत किती सहजतेने पोहोचतात, हे महत्त्वाचे आहे. ५० टक्के किंवा मोफत प्रवास सवलत ही सुविधा सांगण्यापुरती न राहता प्रवाशांना कोणत्याही अनावश्यक अडथळ्यांविना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. अन्यथा सवलतीच्या केवळ घोषणाच ठरतील. ■

८८०६००६१४९

मुंबई वार्तापत्र

अराजकतावाद्यांची कोल्हेकुई !

नागेश दाचेवार

‘विनाशकाले विपरीत बुद्धी’ या सुप्रसिद्ध सुभाषितात दडलेला अर्थ सध्या महाराष्ट्रातील तथाकथित पुरोगामी, ढोंगी विरोधक आणि अराजकतावाद्यांच्या वर्तनावरून तंतोतंत खरा ठरताना दिसत आहे. राज्याच्या राजधानीत आणि संपूर्ण महाराष्ट्रात सध्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाने गणेशोत्सवाचे चैतन्य ओसंडून वाहत आहे. मात्र, काही सुपारीबाज मंडळींनी आणि रडक्या विरोधकांनी एका नव्या वादाला तोंड फोडून स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचे नीच राजकारण सुरू केले आहे. डीजेबंदी आणि त्यावरून विद्यानंद बापट यांना झालेली मारहाण, या एका घटनेचे भांडवल करून राज्य सरकारला थेट आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा जो अश्लाघ्य प्रकार सध्या सुरू आहे, तो म्हणजे निव्वळ ‘चोराच्या उलट्या बोंबा’ आणि विनाशकाळाचीच चाहूल आहे.

कोणत्याही व्यक्तीला मारहाण होणे, मग तो विद्यानंद बापट असो वा दुसरा कुणीही, याचे समर्थन कायद्याचे राज्य मानणारा कोणताही सुसंस्कृत माणूस करणार नाही. बापटांना झालेली मारहाण हा प्रकार काही अतिउत्साही आणि नियम मोडणाऱ्या सार्वजनिक मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून घडला. मात्र, या घटनेनंतर ज्या वेगाने एक विशिष्ट ‘इकोसिस्टिम’ सक्रिय झाली आणि बापटांना रातोरात ‘हिरो’ किंवा ‘क्रांतिकारक’ बनवण्याचा जो घाट घातला गेला, तो अत्यंत संतापजनक आहे. आज बापटांसाठी गळे काढणाऱ्या आणि ‘महाराष्ट्रात लोकशाही धोक्यात आली आहे’ असा टाहो फोडणाऱ्या या ढोंगी मंडळींना एक साधा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे की, तुमच्या संवेदना एवढ्या ‘सोयीस्कर’ कशा असू शकतात? महाविकास आघाडीच्या काळात, सत्तेच्या मस्तीत जेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उघडउघड गळा घोटला जात होता, तेव्हा ही कोल्हेकुई करणारी मंडळी मूग गिळून गप्प का होती? एका साध्या सोशल मीडिया पोस्टवरून अभिनेत्री केतकी चितळेला महिनाभर तुरुंगात डांबण्यात आले, तिच्यावर शाईफेक झाली, तिला अमानुष वागणूक देण्यात आली; तेव्हा हे पुरोगामी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे ठेकेदार कोणत्या मठात झोपले होते? माजी नौदल अधिकारी मदन शर्मा यांना केवळ एक राजकीय व्यंगचित्र फॉरवर्ड केले म्हणून भररस्त्यात तत्कालीन सत्ताधारी पक्षाच्या गुंडांनी रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली; तेव्हा या मंडळींच्या डोळ्यांतील अश्रू कुठे आटले होते? आणि सर्वांत कहर म्हणजे, अनंत करमुसे या सामान्य नागरिकाला थेट तत्कालीन मंत्र्याच्या बंगल्यावर नेऊन, पोलिसांच्या समक्ष बेदम मारहाण करण्यात आली. तत्कालीन सरकारच्या या अघोषित आणिबाणीवर आणि हुकूमशाही प्रवृत्तीवर आज बापटांसाठी छाती बडवणाऱ्या या एकाही ‘विचारवंताने’ किंवा विरोधी पक्षाच्या नेत्याने चकार शब्द काढला नव्हता. कारण तेव्हा त्यांना पोसणाऱ्या ‘मालकांची’ सत्ता होती!

हा सर्व कांगावा म्हणजे केवळ बापटांविषयीचा पुळका नाही, तर यामागे एक मोठे आणि पद्धतशीर षडयंत्र आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा असो, बदलापूरची घटना असो, मालवणमधील शिवरायांचा पुतळा कोसळण्याची दुर्दैवी घटना असो किंवा पेपरफूट आणि आता डीजेबंदीचा मुद्दा; प्रत्येक घटनेत राज्य सरकारला टार्गेट करून महायुतीचे सरकार अस्थिर करण्याचा हा सुनियोजित कट आहे. राज्य सरकारने महिलांना बसचं अर्ध तिकीट, ‘लाडकी बहीण’ यांसारख्या योजनांमधून सर्वसामान्यांच्या थेट घराघरांत पोहोचण्याचे काम केल्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. महाराष्ट्रातील जनता सुज्ञ आहे. त्यांना विरोधकांचा आणि या विशिष्ट इकोसिस्टिमचा दुटप्पीपणा आता पूर्णपणे समजून चुकला आहे. सत्तेसाठी हपापलेल्या आणि केवळ आकसापोटी राज्य सरकारला बदनाम करणाऱ्या या प्रवृत्तीला जनता आगामी काळात त्यांच्याच भाषेत चोख उत्तर देईल, हे नक्की! बापटांना हिरो बनवून स्वतःची राजकीय पोळी भाजणाऱ्यांनी हे कायम लक्षात ठेवावे की, सत्याचा विजय नेहमीच होतो आणि खोटेपणाचा बुरखा फाटायला फार वेळ लागत नाही.

पुणेकरांना ‘डीजे’च्या आवाजामुळे होणारा त्रास आणि त्यांची त्याविरोधातील मागणी पूर्णपणे रास्त व वाजवी आहे. सरकार आवश्यक ती सर्व कायदेशीर पावले उचलेल आणि ठोस कारवाई करेल, हीच मुख्यमंत्र्यांची ठाम भूमिका आहे. परंतु, या प्रश्नाचे भांडवल करून जर कोणी रस्त्यावर कायदा हातात घेत असेल किंवा मारहाण करत असेल, तर त्याचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत केले जाऊ शकत नाही. कायद्याचे राज्य असलेल्या महाराष्ट्रात गुन्हेगारांवर कडक कारवाई केली जात आहे आणि या प्रकरणातही पोलिसांनी तत्परतेने पावले उचलून संबंधितांवर कारवाई केलीच आहे. असे असतानाही, घडलेल्या प्रत्येक घटनेचे खापर परस्पर सरकारवरच फोडून राजकीय पोळी भाजण्याचा जो केविलवाणा कांगावा विरोधकांकडून सुरू आहे, तो म्हणजे त्यांच्या गलिच्छ राजकारणाचा आणि वैचारिक दिवाळखोरीचाच उत्कट पुरावा आहे. ■

९२७०३३३८८६

दहीहंडीचा जल्लोष की जिवाचा ‘जुगार’ ?

श्रीकृष्ण जन्माष्टमी हा आपल्या संस्कृतीतील अत्यंत पवित्र सण आहे. या सणाचा आनंदोत्सव एकमेकांमध्ये आपुलकी वाढवणारा असावा; मात्र काळानुरूप या सणाला जोडल्या गेलेल्या व्यावसायिकतेमुळे आज आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

आज दहीहंडी म्हणजे शुद्ध आनंदोत्सव राहिला नसून ते शक्तिप्रदर्शन, राजकीय चढाओढ आणि जाहिरातींचे मैदान बनले आहे. यातही सर्वांत चिंतेची बाब म्हणजे, लाखो रुपयांच्या बक्षिसांसाठी उंचच उंच दहीहंडी बांधण्याची लागलेली स्पर्धा. प्रसिद्धीसाठी मानवी मनोरे रचताना अनेक गोविंदा पथके अतिशय धोकादायक पद्धतीने आपला जीव धोक्यात घालतात. काही लाखांच्या बक्षिसासाठी किंवा प्रसिद्धीसाठी तरुणांचे अपघात होणे, अपंगत्व येणे किंवा जीव जाणे अत्यंत दुर्दैवी आहे. श्रीकृष्णाने भगवद्गीतेमध्ये मानवी जीवनाचे आणि कर्माचे महत्त्व सांगितले आहे. ‘मनुष्य जन्म अत्यंत दुर्मिळ असून तो अनेक योनींमधून भ्रमण केल्यानंतर प्राप्त होतो.’ अशा या अमूल्य मानवी जीवनाला केवळ काही लाखांच्या बक्षिसांसाठी आणि क्षुल्लक प्रसिद्धीसाठी अशा धोकादायक कसरती करत धोक्यात घालणे अजिबात योग्य नव्हे. प्रशासनाचे नियम पाळून सुरक्षिततेची काळजी घेणे गरजेचे आहे.

प्रिया बागडदेव/छिंदवाडा

■■■

भीषण दुष्काळसदृश परिस्थिती आणि उपाय

यंदाच्या मान्सून हंगामात ‘अल-निनो’च्या तीव्र प्रभावामुळे राज्यात विशेषतः विदर्भ आणि संपूर्ण देशात पावसाने ताण दिल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. जुलै महिन्यात विदर्भात समाधानकारक पाऊस झाल्यानंतर ऑगस्ट महिन्यात पावसाने पूर्णपणे निराशा केली. यामुळे विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा अत्यंत कमी पावसाची नोंद झाली आहे. जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांच्या कालावधीत विदर्भात जवळपास ३५ ते ४० टक्के इतकी पावसाची तूट आहे. नागपूर जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागाच्या मालकीच्या एकूण ४०८ तलावांमध्ये सध्या केवळ ३० ते ३५ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे.

या गंभीर परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य शासनाने, प्रशासनाने आणि नागरिकांनी तातडीने खबरदारीचे उपाययोजना करणे गरजेचे आहे. सर्व स्थानिक संस्थांनी पिण्याच्या पाण्याचे ऑडिट करून पुरवठा मर्यादित करावा. गाड्या धुणे, स्विमिंग पूल, आणि बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यावर तातडीने अंकुश घालावा. उद्योगांना दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या कोट्यात कपात करून ते पाणी पिण्यासाठी राखून ठेवावे. उपलब्ध पाण्याचा साठा कमी असल्याने शेतकऱ्यांनी ठिबक किंवा तुषार सिंचनाचा वापर करावा. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जमिनीत पावसाचे पाणी मुरण्यासाठी आणि प्रत्येक शहरातील प्रत्येक घरासाठी वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली लावणे अनिवार्य केले पाहिजे. आतापासून उपाय योजले तरच भविष्यातील दुष्काळाची दाहकता कमी करता येईल.

प्रा. विलास डोईफोडे/९११२८५७२९९

■■■

शिक्षणविषयक तत्त्वज्ञानात्मक उपदेश

शिक्षक हा दीपस्तंभ आणि आरशासारखा असतो. अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानरूपी किरण प्रसारित करतो. तर हेच किरण परावर्तित करून समाजाच्या सर्व क्षेत्रांपर्यंत पोहचवीत असतो. समाजाला त्याचे खरे प्रतिबिंब काय आहे, याची जाणीव करून देण्याचे कामदेखील शिक्षक करीत असतो. आपल्या भारतीय संस्कृतीत आचार्य या पदाला प्राचीन काळापासून फार मोठा मान आहे. मातृपितृ देवोभव आणि त्यानंतर आचार्य देवोभव असे सांगितले गेले आहे. आजच्या आधुनिक काळात समाजाला खऱ्या अर्थाने सुशिक्षित आणि गुणसंपन्न करण्याचे फार मोठे दायित्व अलिकडच्या शिक्षक या घटकावर सोपवले गेले आहे. परंतु आचार्य ते शिक्षक हा सगळा प्रवास जर बघितला तर काळाप्रमाणे अनेक गोष्टी बदललेल्या किंवा त्यामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या आपल्याला दिसून येतात. तरीदेखील आचार्य ते शिक्षक यांच्याविषयीचा आदरभाव कायम राहिला पाहिजे हा आग्रह आपल्याला नाकारता येत नाही. आज ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करीत असताना त्यामागचे एकूण जीवनमूल्य समजून घेणे आवश्यक आहे. तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, ऑक्सफर्डसारख्या विद्यापीठाचे प्राध्यापक, आंध्र विज्ञापीठ, बनारस हिंदू विद्यापीठांचे उपकुलगुरू आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. राधाकृष्णन यांच्याकडे असलेला विद्याव्यासंग आणि त्यांनी केलेल्या विविध ग्रंथांमधून मांडलेली बहुमूल्य मते ही समाजाला सुशिक्षित, संस्कारी आणि दृढसंपन्न करणारी होती. त्यांनी मांडलेला हा शिक्षणविषयक विचार किंवा तत्त्वज्ञानात्मक उपदेशातून शिक्षक आणि शिक्षणाविषयी सांगितलेला दृष्टिकोन अधिक विस्तारता यावा यासाठी या शिक्षक दिनाचे प्रयोजन आहे. ■

प्रा. मधुकर चुटे/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

परभणीत डीजे-डॉल्बीवर बंदी; ४ ते २५ सप्टेंबरपर्यंत आदेश लागू

उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई

परभणी ,/प्रतिनिधी:- आगामी श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी, बैलपोळा, गणेशोत्सव आदी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर परभणी पोलिसांनी जिल्ह्यात डीजे व डॉल्बी प्रणालीच्या वापरावर बंदी घातली आहे. पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी याबाबत सविस्तर आदेश जारी केले असून, ४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत हा आदेश जिल्ह्यात लागू राहणार आहे. याबाबत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

या आदेशानुसार सण-उत्सवांच्या काळात मिरवणूक, धार्मिक कार्यक्रम अथवा अन्य सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये डीजे किंवा डॉल्बी प्रणालीचा वापर करून मिरवणुका काढता येणार नाहीत. आदेशाचे उल्लंघन करून डीजे किंवा डॉल्बी वाजविल्याचे आढळून आल्यास संबंधित आयोजक, डीजे चालक तसेच मालकाविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

परभणी जिल्ह्यात विविध सण-उत्सवांसह छत्रपती शिवाजी महाराज जयंती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्रीराम नवमी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आदी कार्यक्रमांमध्ये मोठ्या आवाजात डीजे व डॉल्बी प्रणालीचा वापर करून मिरवणुका काढण्याची पद्धत आहे. मात्र, कर्णकर्कश आवाजामुळे ध्वनी प्रदूषण वाढण्याबरोबरच आजारी व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. मोठ्या आवाजामुळे कान, हृदय आणि मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो. याशिवाय सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता असून, सार्वजनिक शांतता व सुरक्षिततेलाही बाधा निर्माण होऊ शकते.

ध्वनी प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने वेळोवेळी विविध आदेश दिले आहेत. ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) अधिनियम, २००० तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतुदींनुसार ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. या नियमांची अंमलबजावणी करताना यापूर्वी विविध जयंती मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच डीजे-डॉल्बी चालक व मालकांविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली आहे. त्यामुळे काही वेळा मंडळांचे पदाधिकारी, राजकीय पक्षांचे व विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी आणि पोलिस प्रशासन यांच्यात वाद निर्माण होऊन तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

सण-उत्सवांच्या काळात डीजे-डॉल्बी सुरू ठेवण्यावरून निर्माण होणारा संभाव्य तणाव आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने यंदा आधीच बंदीचे आदेश जारी केले आहेत. उत्सवाच्या काळात जिल्ह्यातील डीजे व डॉल्बी चालक-मालकांनी आपल्या प्रणालीचा वापर करू नये, तसेच मंडळे व आयोजकांनीही नियमांचे पालन करावे, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

नागरिकांनी आणि उत्सव मंडळांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करून डीजे-डॉल्बीचा वापर टाळावा. पारंपरिक पद्धतीने टाळ-मृदंगाच्या नादात सण-उत्सव उत्साहात, आनंदात आणि शांततेत साजरे करावेत, असे आवाहन परभणी पोलिसांनी केले आहे.

'शेतकरी मेळावा अपडेट

परभणी पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते 'नमो गार्डन'चे लोकार्पण

जिंतूर ,/प्रतिनिधी : जिंतूर शहरातील बलसारोड परिसरात नागरिकांना मोकळ्या वातावरणात विरंगुळा मिळावा, शहराच्या सौंदर्यात भर पडावी आणि नागरिकांसाठी चांगली सार्वजनिक सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने जिंतूर नगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या 'नमो गार्डन'चे उद्घाटन परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. या उद्यानाच्या लोकार्पणामुळे जिंतूर शहराच्या विकासाच्या वाटचालीत आणखी एका महत्त्वपूर्ण सुविधेची भर पडली आहे.

शहरातील नागरिकांसाठी उद्याने ही केवळ विरंगुळ्याची ठिकाणे नसून, आरोग्य, सामाजिक संवाद आणि मानसिक प्रसन्नतेसाठीही महत्त्वाची असतात. वाढत्या शहरीकरणामुळे नागरिकांना मोकळ्या जागांचा अभाव जाणवत असताना जिंतूर नगरपालिकेच्या माध्यमातून 'नमो गार्डन'ची उभारणी करण्यात आली आहे. त्यामुळे सकाळी व सायंकाळी फेरफटका मारण्यासाठी तसेच कुटुंबासह वेळ घालविण्यासाठी नागरिकांना हक्काचे ठिकाण उपलब्ध झाले आहे.

उद्घाटन कार्यक्रमाला जिंतूरच्या प्रशासकीय, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. तहसीलदार शितल कचवे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी उमेश ढाकणे, नगराध्यक्ष प्रताप देशमुख, गटनेते मुन्ना गोरे, उपनगराध्यक्ष मोहसीन खान पठाण यांच्यासह नगरसेवक शेख अथर, गोपाळ रोकडे, प्रदीप चौधरी, मुन्ना कुरैशी, योगेश काशिकर, डॉ. दुर्गादास कान्हाडकर, प्रदीप चव्हाण, दत्ता काळे,मनीषाताई केंद्रे, माजी नगरसेवक रहमान लाडले, पंचायत समिती सभापती किशोर खिस्ते, उपसभापती माधव दराडे, प स सदस्य तहसीन देशमुख, शिवाजी बोर्डीकर, रमण तोष्णीवाल, संदीप शर्मा महाराज,मंदार कोकडवार,यांचीही उपस्थिती होती. याशिवाय जिंतूर नगरपालिकेचे कर्मचारी आणि विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मयूर जोशी यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी साठी नगर परिषद कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

जिंतूरमध्ये मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर

अयोध्याबाई तोष्णीवाल चारीट्रेबल ट्रस्टचा उपक्रम

जिंतूर,/प्रतिनिधी- ''मानव सेवा हीच ईश्वर सेवा'' या सेवाभावी भावनेतून स्व. गिरधारीलालजी तोष्णीवाल यांच्या तेराव्या पुण्यस्मरणानिमित्त शहरात मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

स्व. आयोध्याबाई रामनारायणजी तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्ट आणि उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले असून शनिवार, ता . १२ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत डॉ. सुभाषचंद्र राठी बालक विद्यामंदिर, वरूड रोड, जिंतूर येथे हे शिबिर होणार आहे. तालुक्यातील सर्व नागरिकांनी, विशेषतः आर्थिकदृष्ट्या गरजू आणि मोतीबिंदूची समस्या असलेल्या रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या शिबिरात सहभागी रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून योग्य सल्ला व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.तपासणी दरम्यान मोतीबिंदू आढळून आलेल्या व शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या रुग्णांची उदगीर येथील सुसज्ज नेत्र रुग्णालयात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या रुग्णांच्या प्रवासाची, राहण्याची आणि जेवणाची मोफत व्यवस्था करण्यात येणार आहे. शिबिरासाठी नोंदणी करताना नाममात्र २० रुपये प्रवेश शुल्क आकारण्यात येणार असून रुग्णांनी आधारकार्ड किंवा मतदान ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच सध्या सुरू असलेली औषधे, डॉक्टरांचे वैद्यकीय अहवाल सोबत आणणे गरजेचे आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी उदगीर येथे नेण्यात येणार आहे. शिबिराच्या नोंदणीसाठी सुभाषआप्पा एकशिंगे, गजानन घुगे, राजेश बियाणी आणि विपीन पांडे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शेतकऱ्यांच्या पंखांना बळ देण्याची गरज दुष्काळ जाहीर करण्याची आ.खानची मागणी

सोनपेठ,/प्रतिनिधी- पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे खरीपाची

पिके करपून जात आहेत. त्यामुळे परभणी व हिंगोली जिल्ह्यातील शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.यासाठी शासनाने संपूर्ण परभणी व हिंगोली जिल्हा दुष्काळी जाहीर करुन येथील शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची मागणी विधान परिषदेचे आमदार सईद खान यांनी राज्याच्या कृषी मंत्र्यांकडे केली आहे.

गतवर्षी अतिवृष्टीमुळे या परभणी व हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे होत्याचे नव्हते झाले. सर्व पिके पाण्याखाली गेली व ओला दुष्काळ झाला. त्यामुळे या जिल्ह्यातील शेतकरी पुरता खचून गेला होता. परंतु शासनाच्या तुटपुंज्या मदतीवर बळीराजा यावर्षी खरिपाचे पेरणीसाठी पुन्हा कंबर बांधून सज्ज झाला आणि उधारी करून कसेबसे बियाणे,खते खरेदी करून अल्पशा पावसावर काळ्या आईची ओटी भरली. परंतु आज त्याच्याकडे निसर्गाने पाठ फिरवल्यामुळे पावसाचा मोठा खंड पडला. सोयाबीन कापूस तूर मूग उडीद आदी उगवलेली पिकं करपून जात आहेत. शेतीमध्ये लावलेला लाखो रुपयाचा जुगार बळीराजा यावर्षी हरला आहे. याची जाण सरकारला आसने अत्यंत गरजेचे आहे. सध्याची परिस्थिती पाहता शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर विधान परिषदेचे आमदार सईद खान यांनी शेतकऱ्यांच्या पंखांना बळ देण्यासाठी कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची भेट घेऊन दोन्ही जिल्ह्यांतील सध्याची परिस्थिती त्यांच्यासमोर सविस्तर मांडली आहे.सध्याची परिस्थिती लक्षात घेता परभणी व हिंगोली जिल्ह्यांत तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरघोस आर्थिक मदत द्यावी, अशी ठाम मागणी यावेळी त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांना गेली दोन वर्षापासून सुरू असलेल्या संकटातून सावरण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक ती मदत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

स्वाधार योजनेतील पात्र विद्यार्थ्यांनी १० सप्टेंबरपर्यंत अर्ज करावा

परभणी,/प्रतिनिधी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही प्रवेश न मिळालेल्या अथवा प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी सादर केलेल्या अर्जांमधील त्रुटींची पूर्तता येत्या गुरुवार १० सप्टेंबरपर्यंत करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त राजू एडके यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व अन्य आवश्यक सुविधांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते.

उपजिल्हाधिकारी शैलेश लाहोटी यांचा पालकमंत्री बोर्डीकर यांच्या हस्ते सत्कार

सेलू,/प्रतिनिधी- प्रशासकीय सेवेत उत्कृष्ट कामगिरी बजावत जनहिताच्या विविध उपक्रमांना प्रभावीपणे गती दिल्याबद्दल सेलू येथील उपजिल्हाधिकारी शैलेश लाहोटी यांचा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पालकमंत्री बोर्डीकर यांनी उपजिल्हाधिकारी लाहोटी यांच्या कार्याचे कौतुक करून, प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या संवेदनशीलतेने समजून घेत त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले. शासनाच्या विविध योजना आणि विकासकामांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

उपजिल्हाधिकारी शैलेश लाहोटी यांनी आपल्या कार्यकाळात महसूल प्रशासन, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत हा सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे नागरिकांना प्रशासनाशी संबंधित कामकाजात अधिक सुलभता निर्माण झाली असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. सत्कार स्वीकारताना शैलेश लाहोटी यांनी पालकमंत्री मेघना बोर्डीकर तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. प्रशासनातील प्रत्येक अधिकारी व कर्मचारी नागरिकांच्या सेवेसाठी कार्यरत असून, भविष्यातही शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या सत्कार सोहळ्यास प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते.

जिंतूर तालुका कोरडा दुष्काळ ग्रस्त जाहीर करा- भांबळे

जिंतूर ,/प्रतिनिधी- तालुक्यांत पावसाचा मागील दोन महिन्या-हून अधिक काळ खंड पडल्यामुळे पिके धोक्यात आल्याने पंचनामे न करता सरसकट आर्थिक मदत देणे तसेच मागील वर्षाचा व चालू वर्षाचा पीक विमा वितरित करण्यासाठी मा.आ.विजयराव भांबळे व राष्ट्रवादी काँग्रेस जिंतूरच्या वतीने तहसीलदार जिंतूर यांना लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली, यावेळी कृषी अधिकारी घुगे पुरवठा विभागाचे होळंबे व विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

जिंतूर तालुक्यात यावर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला पाऊस समाधानकारक होईल या अपेक्षेने परिसरातील शेतकऱ्यांनी कर्ज काढून, कशीबशी जुळवाजुळव करून खरीप पिकांची सोयाबीन, कापूस, तूर, मुग, उडीद, हाळद, ऊस, कांदा, राजमा व फळ बागांची मोठ्या कष्टाने पेरणी केली होती. परंतु, मागील दोन महिन्याहून अधिक काळ जिंतूर तालुक्यात पावसाने पूर्णपणे खंड पाडला आहे. कडक ऊन आणि पावसामुळे शेतातील पिके मान टाकून सुकण्याच्या मार्गावर आहेत. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची वेळ आली असून, शेतकरी तीव्र आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. त्यामुळे पंचनामे न करता सरसकट आर्थिक मदत करणे, पावसाच्या खंडामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पारंपरिक व जाचक अटींचे पंचनामे करत बसल्यास शेतकऱ्यांचा वेळ आणि मानसिक त्रास वाढेल. त्यामुळे कोणत्याही जाचक अटी व पंचनाम्यांची औपचारिकता न पाळता, जिंतूर व सेलू तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सोयाबीन, कापूस, तूर, मुग, उडीद, हाळद, ऊस, कांदा, राजमा ई.पिकांसाठी सरसकट हेक्टरी २५ हजार रुपये तर फळ बागेसाठी हेक्टरी ४० हजार रुपये एवढी भरीव आर्थिक मदत तातडीने जाहीर करून खात्यात जमा करावी. मागील वर्षाचा खरीप व रब्बी पीक विमा तात्काळ वितरित करा, मागच्या वर्षीच्या (खरीप व रब्बी) पीक विम्याची रक्कम अद्यापही अनेक पात्र शेतकऱ्यांना मिळालेली नाही. प्रशासनाने विमा कंपन्यांना सूचना देऊन मागील वर्षाचा रखडलेला पीक विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावा. तसेच चालू वर्षाचा खरीप पीक विमा तात्काळ मंजूर करून वितरित करा, चालू खरीप हंगामात पावसाने मोठा दगा दिल्यामुळे नैसर्गिक आपत्ती ओढवली आहे.

चालू वर्षाच्या खरीप पिकाचा पीक विमा तात्काळ मंजूर करून, अंतरिम मदत म्हणून विमा रक्कम तातडीने वितरित करावी. तसेच जिंतूर व सेलू दोन्ही तालुके दुष्काळग्रस्त घोषित करा, जिंतूर व सेलू तालुक्यात पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची गंभीर दखल घेऊन या दोन्ही तालुक्यांना दुष्काळग्रस्त किंवा कमी पावसामुळे प्रभावित क्षेत्र घोषित करण्यात यावे, जेणेकरून शेतकऱ्यांना वीज बिल माफी, कर्ज वसुलीला स्थगिती व इतर शासकीय सवलती तात्काळ मिळू शकतील. तसेच या निवेदनाची गंभीर व तात्काळ दखल घेऊन सदर मागण्या शासन दरबारी पाठवून शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी त्वरित पावले उचलावीत, अन्यथा परिसरातील शेतकऱ्यांना नाइलाजाने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, याची नोंद घ्यावी. अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर मा.आ.विजयराव भांबळे, तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत, जि.पं. सदस्य अजयराव चौधरी, माणिकराव हरकळ, शंकरराव जाधव, माजी जि.पं.सदस्य विश्वनाथ राठोड, बाळासाहेब घुगे, विठ्ठलराव घोगरे, पं.स.सदस्य नंदकिशोर अंभूरे, अविनाश मस्के, मुजाहेद कादरी, राहुल कणकुटे, माजी सभापती मधुकरराव भवाळे, गणेशराव इलग, शरद अंभूरे, विजय खिस्ते, नगरसेवक जाबेर भाई, करीम लाला, माजी नगरसेवक मनोहर डोईफोडे, आहेमद बागबान, शाहेद बेग मिर्झा यांच्यासह सरपंच कवडा राजेश चव्हाण, माधव घोगरे, सुधारक मस्के, राहुल घुले, अभिजित भांबळे, शौकत लाला, खयुम कादरी, सुलेमान सिद्धिकी, अक्कू भाई, जगदीश शेंद्रे, सुरेश सानप, जिवन भवरे, शेख जलील, दिनकर सातपुते, ज्ञानेश्वर काळे, गुलाबराव सानप, रामेश्वर गायकवाड, रोहिदास राठोड, ॲड. कपिल निकम, नयुम कादरी, अब्दुल मुखीद, विश्वंभर पडघन, अशोक प्रधान, पंडित जाधव, धर्मा राठोड, श्रीराम जाधव, यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

एकलव्य बाल विद्या मंदिर माध्यमिक शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

जिंतूर,/प्रतिनिधी- विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारा, त्यांच्या मनात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करणारा आणि संस्कारांची शिदोरी देणारा शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार आहे. अशा या ज्ञानदात्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एकलव्य बाल विद्या मंदिर माध्यमिक, जिंतूर येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. गीते एस. पी. होते. प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक श्री. दराडे एस. बी. तसेच संस्था सदस्य श्री. शेखर लहाने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी शाळेतील सहशिक्षक श्री. शेषराव चौधरी व श्री. रवी मते यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व आणि शिक्षक-विद्यार्थी नात्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर मनोगते व भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या या भावपूर्ण अभिव्यक्तीने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक श्री. गीते एस. पी. यांनी शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे प्रेम, त्याग, संस्कार आणि अथक परिश्रम असतात, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्था सदस्य श्री. शेखर लहाने यांच्या हस्ते शाळेतील सर्व शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन मनः पूर्वक सत्कार करण्यात आला.

जिल्हाधिकाऱ्यांनी शेतावर जाऊन केली पिकांची पाहणी

वडद, बोंडाळा येथे सोयाबीन, कापूस पिकांची घेतली माहीती

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ५ सप्टेंबर

ऑगस्ट महिन्यात पावसाने दिलेल्या ओढीमुळे व अल निनोच्या प्रभावामुळे हिंगोली तालुक्यातील पिकांवर पाण्याचा ताण निर्माण झाला आहे. विशेषतः सोयाबीन व कापूस पिकांवर त्याचा परिणाम जाणवत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी हिंगोली तालुक्यातील वडद व बोंडाळा येथे प्रत्यक्ष शेतावर जाऊन पिकांची पाहणी केली. पिकांची सद्यस्थिती, पावसाची परिस्थिती आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींची त्यांनी यावेळी माहिती घेतली.

वडद येथे शेतकऱ्यांच्या शेतावर सोयाबीन व कापूस पिकांची पाहणी करताना पावसाच्या खंडामुळे पिकांवर आलेला ताण जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहिला. काही ठिकाणी पाण्याअभावी सोयाबीन व कापूस पिके सुकण्यास सुरुवात झाल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत पिकांची अवस्था, उपलब्ध सिंचनाची साधने, जमिनीतील ओलावा आणि पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या पिकांची माहिती जाणून घेतली. पावसाचा खंड लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून त्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

दरम्यान, बोंडाळा येथे 'कापूस उत्पादकता अभियान' अर्थात 'कापूस क्रांती' अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या 'क्लोजर लागवड पद्धती'च्या प्रात्यक्षिक प्लॉटचीही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पाहणी केली. या लागवड पद्धतीमुळे कापूस पिकातील उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची त्यांनी माहिती घेतली. आधुनिक व शास्त्रोक्त लागवड तंत्रज्ञानाचा वापर, पिकांचे योग्य व्यवस्थापन तसेच उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर याबाबत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून त्यांनी माहिती जाणून घेतली.

पावसाचा खंड हा शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय असला तरी शेतकऱ्यांनी घाबरून न जाता उपलब्ध पाण्याचा नियोजनबद्ध आणि कार्यक्षम वापर करावा. पिकांची सद्यस्थिती लक्षात घेऊन कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या संपर्कात राहून आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. पिकांवरील पाण्याचा ताण कमी करण्यासाठी उपलब्ध जलस्रोतांचा योग्य पद्धतीने वापर आणि पीक व्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर भर देण्याचे त्यांनी सांगितले. कृषी विभागाने पावसाच्या परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून शेतकऱ्यांना वेळोवेळी आवश्यक सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, यावरही यावेळी भर देण्यात आला. या पाहणी दौऱ्यावेळी कृषी उपसंचालक प्रसाद हजारे, तालुका कृषी अधिकारी शिवसंदीप रणखांब यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक शेतकरी उपस्थित होते.

३० ऑक्टोबर शासकीय वसतीगृहासाठी अर्ज करावेत-गुट्ठे

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ५ सप्टेंबर

सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात हिंगोली जिल्ह्यातील शासकिय वसतिगृहात प्रवेशासाठी प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ११ वी, बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांनी शासनाचे संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी जिल्हयातील ज्या पात्र इयत्ता ११ वी, बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांना चालु शैक्षणिक वर्षात अर्ज करता आले नाहीत, त्यांनी ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त श्रीमती गिता गुट्ठे यांनी केले आहे.

तसेच शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात/शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुलां/मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सन २०२५-२६ या वर्षात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता ऑनलाईन अर्ज नुतनीकरण करणेकरीता दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत समाज कल्याण विभागाच्या पोर्टलवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनी नुतनीकरण अर्ज सादर करताना मागील वर्षाचे गुणपत्रक अपलोड करणे तसेच चालू शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमाची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी अर्ज नुतनीकरण केला होता व त्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळाला होता, अशा विद्यार्थ्यांना विद्यमान पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षात प्रथम वर्षाकरीता अर्ज सादर केला होता व त्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळालेला आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनाही विहित मुदतीत नुतनीकरण अर्ज सादर करता येणार आहे.

विद्यार्थ्यांचे अर्ज विहित वेळेत व मुदतीत प्राप्त होऊन त्यांची तपासणी करुन स्वाधार योजनेचा लाभ वेळेत अदा करणे आवश्यक असल्याने, सन २०२५-२६ मध्ये स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंतच्या मुदतीत आपला नुतनीकरण अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा. विहित मुदतीत अर्ज सादर न केल्यास संबंधित विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तरी पात्र सर्व विद्यार्थ्यांनी विहित वेळेत शासकिय वसतिगृहासाठी अर्ज व स्वाधार योजनेसाठी आपले नुतनीकरण अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त, श्रीमती गीता गुट्ठे यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना घरबसल्या मिळणार आधुनिक शेतीचे धडे

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ५ सप्टेंबर

बदलत्या हवामानात शाश्वत शेतीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत 'डिजिटल शेतीशाळा' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला जात आहे. हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, महिला शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक महेश तीर्थकर यांनी दिली.

या उपक्रमांतर्गत राहुरी, परभणी, दापोली आणि अकोला कृषी विद्यापीठांतील नामवंत कृषी शास्त्रज्ञ शेतकऱ्यांना ऑनलाईन (झुम आणि युट्युबच्या माध्यमातून) मार्गदर्शन करणार आहेत. अतिवृष्टी किंवा पावसाचा खंड अशा प्रतिकूल हवामानात पिके वाचवण्याचे तंत्रज्ञान, जीवामृतासारख्या जैविक निविष्ठांची निर्मिती आणि रासायनिक खतांचा खर्च कमी करण्याबाबत थेट प्रात्यक्षिकासह माहिती दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, या लाईव्ह सत्रादरम्यान शेतकरी शास्त्रज्ञांना प्रश्न विचारून आपल्या शंकांचे जागेवरच निरसन करून घेऊ शकणार आहेत.

ही शाळा संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे मोफत असून, सोमवार ते शनिवार दररोज विविध पिकांसाठी झूमवर सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार बाजरी, सोयाबीन, ख. ज्वारी, कापूस, भुईमूग, भात, राजमा, मका, नाचणी, तूर-मूग-उडीद आणि भाजीपाला या प्रमुख पिकांवर संध्याकाळी ६.१५ आणि ७.३० वाजता तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल.

शेतकरी वैयक्तिकरित्या किंवा गटाच्या माध्यमातून झूम ॲपद्वारे (आयडी व पासकोड वापरून) या सत्रात सहभागी होऊ शकतात. तसेच, 'कृषी विभाग महाराष्ट्र शासन' आणि 'पाणी फाउंडेशन' च्या अधिकृत युट्यूब व फेसबुक चॅनेलवरही याचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन शेती किफायतशीर करण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही तीर्थकर यांनी केले आहे.

हिंगोली- १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदानीत, अंशत: अनुदानीत कायम आस्थापनेवरील नियमित वेतन श्रेणीतील शिक्षकांना जुनी पेन्शन लागू करा या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी शिक्षक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात आला. छाया- विजय गुंडेकर

संक्षिप्त वृत्त

सेनगाव तालुक्यातील वायचाळ पिंपरी येथील श्री कालभैरव कावड यात्रेचे स्वागत

हिंगोली- सेनगाव तालुक्यातील वायचळ पिंपरी येथील श्री कालभैरव कावड ग्रुप च्या वतीने मागील चार वर्षापासून श्री क्षेत्र औंढा नागनाथ ते वायचाळ पिंपरी पर्यंत पायी कावड यात्रा काढण्यात येत असते. हिंगोली चे नगरसेवक नाना नायक यांच्या निवासस्थानी कावड यात्रेतील सहभागी झालेल्या भक्तांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली. यावेळी आमदार संतोष बांगर यांच्या हस्ते महादेवाची भव्य आरती करण्यात आली. यावेळी युवा जिल्हा प्रमुख राम कदम, नगरसेवक नाना नायक, नगरसेवक राजू गोटे, नगरसेवक कपिल खंडेलवाल, मयुर कयाल, अनिल नैनवाणी, क्रिष्णा अग्रवाल, सुमित चौधरी, यांच्या सह आदींची उपस्थिती होती.

एबीएम शाळेमध्ये शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ५ सप्टेंबर

शहरातील आरटीओ कार्यालयासमोर, औंढा रोड येथील प्रसिद्ध एबीएम इंग्लिश हायस्कूलमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकांविषयी आदर, कृतज्ञता आणि शिक्षणाचे महत्त्व रुजविण्याच्या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर, मुख्याध्यापक जोसेफ के. जे., उपमुख्याध्यापक आदेश बोराळकर, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व अधोरेखित करणारी भाषणे, मनमोहक नृत्य सादरीकरणे आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेली ही व्यासपीठावरील संधी कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली.

शिक्षक दिनानिमित्त इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शिक्षक होण्याचा अनोखा अनुभव देण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका आत्मविश्वासाने पार पाडत वर्गामध्ये अध्यापन केले. या उपक्रमातून शिक्षकांची जबाबदारी, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे कौशल्य आणि शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांचे महत्त्व याचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

शाळेचे नृत्य शिक्षक संदीप जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी सादर केलेली नयनरम्य नृत्ये कार्यक्रमाची रंगत वाढविणारी ठरली. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर यांनी उपस्थितांना संबोधित करताना शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे शिल्पकार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, शिक्षकांचा सन्मान ही आपल्या संस्कृतीची गौरवशाली परंपरा असल्याचे त्यांनी नमूद केले.

शाळेचे मुख्याध्यापक जोसेफ के. जे. यांनी शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते हे ज्ञान, संस्कार आणि विश्वासावर आधारित असल्याचे सांगत शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. उपमुख्याध्यापक आदेश बोराळकर यांनीही विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे स्थान अधोरेखित करत शिक्षकांविषयी आदर आणि कृतज्ञतेची भावना कायम ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनी कनक अग्रवाल, वीरा भारुका आणि स्वरा भुसारे यांनी केले. तर कनक जगदीश अग्रवाल याने आभार मानले.

वरिष्ठ गटाच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ५ सप्टेंबर

वरिष्ठ गटाच्या महिला व पुरुष राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा-२०२६-२७ आयोजित करण्यात येणार असुन दि.२१ ते २४ नोव्हेंबर रोजी चार दिवशीय या भव्य स्पर्धा होणार असुन राज्यातील २ हजार महिला व पुरुष खेळांडु हिंगोली येथे दाखल होणार आहेत. यांच्यासोबत पंच प्रतिनिधी, पदाधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेच्या जय्यत तयारीला सुरुवात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव निलेश जगताप यांनी हिंगोली जिल्हा पासिंग व्हॉलीबॉल असोसिएशनला दि.२९ ऑगस्ट रोजी पत्र पाठविले आहे. हिंगोलीत पहिल्यांदाच वरिष्ठ गटाच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजन करण्याचा सन्मान मिळाला असुन या स्पर्धेत सहभागी खेळाडुंसाठी चांगल्या व आवश्यक सुविधासह निवासव्यवस्था, व्हॉलीबॉल मैदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नगर पालिका यासह अनेक यंत्रणाचे सहकार्य घेण्यात येणार आहे. यासाठी लवकरच व्यापक बैठक घेऊन क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, खेळांडु, क्रीडा शिक्षक यासह विविध असोसिएशनचे पदाधिकारी यांना निमंत्रित करुन आयोजन समिती स्थापन करण्यात येणार आहे. यासह विविध समित्यांची स्थापना करुन राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेण्यात येणार आहेत. आयोजक कल्याण देशमुख, नावेद खान, महेबुब खान पठाण यांच्यासह व्हॉलीबॉल असोसिएशनचे अजय सावंत, आनंद अडकिने आदी परिश्रम घेत आहेत.

आदर्शमध्ये शिक्षक दिनानिमित्त प्राध्यापक, कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ५ सप्टेंबर

मास्को केअर मल्टी स्पेशलिटी चिकित्सालय नागपूर आणि आदर्श महाविद्यालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने आज शिक्षक दिनाचे औचित्य साधून प्राणीशास्त्र विभागात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

या तपासणी दरम्यान जापानीस टेक्नॉलॉजी मशीनद्वारे संपूर्ण बॉडी स्कॅन, ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, थायरॉईड, बॉडी मास इंडेक्स, कोलेस्ट्रॉल, हृदयरोग, नेत्ररोग, स्त्रीरोग, किडनी संबंधित रोग, विटामिन जीवनसत्व कमतरता, रोगप्रतिकारक शक्ती तसेच पंचकर्म चिकित्सा संबंधित सर्व रोगांचा उपचार ज्यामध्ये अभ्यंकथेरपी, नस्य थेरेपी, पत्रपिंड स्वेदना, पिष्टकशाली पिंडस्वेदना, शिरोधारा, अक्षीतर्पन थेरपी, यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

रोजच्या धकाधकीच्या जीवनात कामाच्या अतिताणा मुळे आहार सल्ला, हृदयाचे स्वास्थ्य, त्वचा चमडी विकार, केस गळणे, अपचन, पित्त, गॅस इत्यादीवर वैद्यकीय सल्ला डॉ. अभिता कवाडे आणि त्यांची टीम यांनी उपस्थिताना दिला.

या आरोग्य तपासणी शिबिराचा महाविद्यालयातील ११९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी लाभ घेतला. या शिबिरासाठी मास्को केअर आयुर्वेदिक रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष मिस कोहिनूर धृतराज, आयुर्वेदिक सल्लागार आचल सायरे, टेक्निशियन तेजस्विनी, आहार मार्गदर्शक विनया आणि दिव्या इत्यादींनी मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य प्रो.डॉ.विलास आघाव, उपप्राचार्य प्रो.डॉ. संजीवकुमार नरवाडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ.सोनलकुमार नगरकर, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. बी. एस.साळवे प्राणीशास्त्र विभागाचे प्रो. डॉ. प्रशांतकुमार जोशी स्टाफ सचिव डॉ. सत्यजित चव्हाण,डॉ.अण्णाजी मडावी, डॉ. शैला वाघ, सौ.ज्योती मस्के, पी.बी.वानखेडे, विजय शिंदे, मुरलीधर वावधने, शामराव ठोंबरे, संतोष बिडवई इत्यादीने परिश्रम घेतले.

हिंगोलीच्या प्रसिध्द श्री विघ्नहर्ता चिंतामणी मंदिरात गणेशोत्सवाची जय्यत तयारी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ५ सप्टेंबर

अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी हिंगोली शहरात मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. शहरातील गड्डी गल्लीतील अतिशय प्रसिद्ध असलेल्या श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिराच्या परिसरात गणेशोत्सवाच्या तयारीची लगबग वाढली असून सध्या मंदिर परिसराची भव्य रंगरंगोटी आणि मंडपाचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे.

गड्डी गल्लीतील हे श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर केवळ हिंगोलीतच नव्हे, तर सर्वदूर प्रसिद्ध आहे. या मंदिरातील बाप्पाला 'मोदकांच्या नवसाचा गणपती' म्हणून विशेष महत्त्व आहे. श्री विघ्नहर्ता चिंतामणी भक्तांच्या हाकेला धावून जाणारा आणि मनोकामना पूर्ण करणारा असल्याने दरवर्षी गणेशोत्सवात हजारो भाविक येथे नवस बोलण्यासाठी व फेडण्यासाठी हजेरी लावतात.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिराची स्वच्छता करून संपूर्ण गाभाऱ्याची आणि मंदिर परिसराची आकर्षक रंगरंगोटी केली जात आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता, त्यांच्या सुरक्षेसाठी आणि सुलभ दर्शनासाठी भव्य व सुरक्षित मंडप उभारण्यात येत आहे. उत्सव काळात गर्दीचे नियोजन, रांगेची व्यवस्था आणि सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर समिती आणि स्थानिक कार्यकर्त्यांकडून जय्यत तयारी केली जात आहे. बाप्पाच्या आगमनाला आता अवघे काही दिवस उरल्याने गड्डी गल्ली परिसराला उत्सवाचे स्वरूप आले असून संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

लातूरमध्ये आज रंगणार सुरताल संगीत महोत्सव

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ सप्टेंबर : संगीत क्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व गुरुवर्य पं. शांताराम चिगरी गुरुजी व गुरुमाई शकुंतलादेवी चिगरी यांच्या पवित्र स्मरणार्थ लातूरमध्ये 'सुरताल संगीत महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. आज रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता भालचंद्र ब्लड बँक सभागृहात हा भव्य सांगीतिक सोहळा रंगणार आहे.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण पुणे येथील सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. अंगद गायकवाड यांचे मुख्य गायन असणार आहे. आपल्या कसदार, भावपूर्ण आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या गायकीने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे पं. गायकवाड विविध राग आणि बंदिशींचे सादरीकरण करणार आहेत. महोत्सवाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे राष्ट्रीय तरावर आपल्या सुरांनी रसिकांना त्रमुग्ध करणाऱ्या अंजली गायकवाड (इंडियन आयडॉल फेम) आणि नंदिनी गायकवाड (पुणे) यांचे शास्त्रीय गायन. गायकवाड भगिनींच्या सुरेल सादरीकरणाचा आणि जुगलबंदीचा अविस्मरणीय अनुभव लातूरकर संगीतप्रेमींना घेता येणार आहे. या स्वर मैफलीला पुणे येथील नामवंत बादक विजय श्रीमंगले (हार्मोनियम) आणि चैतन्य पवार (तबला) यांची उत्कृष्ट साथसंगत लाभणार आहे. चिगरी गुरुजींच्या समृद्ध संगीत परंपरेला अभिवादन करणाऱ्या या स्वरयज्ञात शास्त्रीय संगीतप्रेमी, संगीत अभ्यासक, रसिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अविस्मरणीय सांगीतिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन सुरताल संगीत महाविद्यालय आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

विविध वृत्त.....

शालेय क्रीडा स्पर्धा सहभागासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.५ सप्टेंबर : सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत समावेश असलेल्या विविध स्तरावरील शालेय व इतर क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व शाळांनी या स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

या शैक्षणिक वर्षापासून क्रीडा संचालनालय स्तरावरून विकसित करण्यात आलेल्या HTTPS://SPORTS.MAHARASHTRA.GOV.IN या ऑनलाईन संकेतस्थळाद्वारे शालेय क्रीडा स्पर्धांसाठी आवश्यक असणारी शाळांची नोंदणी, प्राथमिक प्रवेशिका, संलग्नता आणि प्रवेश शुल्क भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यात या शालेय क्रीडा स्पर्धांची सुरुवात सप्टेंबर २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यापासून प्रस्तावित करण्यात आली असल्याने, तत्पूर्वी जिल्ह्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांनी या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपली सर्व आवश्यक माहिती भरून तसेच विहित ऑनलाईन शुल्क अदा करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. या क्रीडा स्पर्धांच्या नोंदणीबाबत किंवा इतर प्रक्रियेबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास क्रीडा अधिकारी धिरज बावणे (मो. नं. ८००७९०७७१३) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

महामंडळ मालामाल पण कार्डधारकांची लुट

तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. ५ सप्टेंबर : एक सप्टेंबर पासून बसमध्ये प्रवास करताना एन सी एम सी कार्ड अनिवार्य केले होते . पण या दिवशी बसमध्ये कोणाकडेच हे कार्ड नव्हते . त्यामुळे त्यांना फुल तिकीट काढूनच प्रवास करावा लागला ही वस्तुस्थिती आहे . आणि ज्यांनी हे कार्ड काढले ते प्रवास करताना सोबत नव्हते . काही प्रवाशांच्या जवळ हे कार्ड असूनही त्याचा फायदा त्यांना झाला नाही कारण त्या कार्डात पैसे नसल्यामुळे त्यांनासुद्धा फुल तिकीट काढूनच प्रवास करावा लागला हे सांगायला नको .

अमृत जेष्ठ नागरिक, जेष्ठ नागरिक आणि महिला यांच्यासाठी एसटी महामंडळाने इबिक्स लि. आणि एन एस डी एल पेमेंट बॅक यांच्यावर एन सी एम सी कार्ड काढून देण्याची जबाबदारी सोपवली होती परंतु कार्ड काढण्यासाठी भल्या सकाळीच कार्यालयासमोर भल्या मोठ्या रांगत असल्याचे चित्र बघून महमंडळाने काही खाजगी ग्राहकसेवा, इतर कॉम्प्युटर ची कामे करणाऱ्या दुकानदारांवर ही जबाबदारी सोपविली खरी पण हे दुकानदार मनमानी करत कितीही पैसे घेऊन कार्ड देत असल्याच्या घटना घडल्या होत्या .

काही महिलांनी सांगितले की, कार्ड काढण्यासाठी२००/ ते३००/ रुपये घेतले आणि कार्ड आल्यावर ते देण्यासाठी परत १००/ ते२००/ घेतले असून कार्डवर बॅलन्स एक रुपयाही टाकला नाही.

गरीब किंवा म्हातारे कोतारे यांना मुळात कार्ड विषयी कसलीच माहिती नाही किंवा एस.टी . महामंडळाने माहिती प्रसारीत केली नाही किंवा एखादा रिक्षा भोंगसह शहरात फिरविला नसल्यामुळे त्यांना कार्ड विषयी माहिती नाही अशांची लुटमार होत असल्याचे समजत आहे .

कार्ड काढल्यानंतर ते पोस्टाने का पाठविले जात नाही हा मुळात प्रश्न आहे . आर्थिक लुट करण्याच्या हेतूने हे केले असावे असे अनेक कार्ड काढणाऱ्यांचे म्हणणे आहे .

त्यामुळे या पुढे तरी सदरील कार्ड पोस्टाने च पाठविण्याची सोय करावी जेणेकरून कार्डधारकांची आर्थिक लुट होणार नाही एक सष्टेंबरला बहुतांश प्रवाशाकडे कार्ड नसल्यामुळे, त्यांच्याकडे होते पण त्यात बॅलन्स नसल्यामुळे तर काहींना कार्ड काढूनही न मिळाल्यामुळे अशा प्रवाशांना फुल तिकीट काढावे लागल्याने त्या दिवशी महामंडळ मालामाल झाले . कधी नव्हे त्यादिवशी धंदा जोरात होता . आतापर्यंत अनेकांना हाफ तिकीट किंवा फुकट न्यावे लागत होते त्यांच्याकडून फुल तिकीट घेत असल्यामुळे महामंडळ मालामालचं झाले ना? या सर्व प्रकारानंतर महामंडळाने हे कार्ड वापरण्यावर १९ तारखेपर्यत मुदतवाढ दिली . शिवाय ज्यांनी कार्ड काढण्याची प्रोसेस केली आहे अशांना एक पावती मिळते ती पावती सुद्धा या काळात ग्राह्य धरली जाणार असल्यामुळे प्रवाशांना काही अंशी दिलासा मिळाला आहे .

मुळात प्रश्न येतो तो असा की, एसटी महामंडळाने या कार्ड बाबत म्हणावी तशी प्रसिद्धी दिली नाही त्यामुळे कार्डविषयी ची माहिती सर्वसामान्य प्रवाशांना मिळाली नाही . कार्ड काढून देणाऱ्यांवर महामंडळाने लक्ष न दिल्यामुळे बहुतांश प्रवाशांची आर्थिक लुट झाली . आणि कार्ड तयार झाल्यावर त्यांना पोस्टाने न पाठविल्याने कार्ड काढणाऱ्याचे आयतेच फावले या विषयी बस स्टॅण्ड वर माहिती घेतली असता असे समतले की, कार्ड काढण्यासाठी दोनशे रु . कार्ड तयार झाल्यावर दीडशे रु . या दीडशे मधून शंभर रु. कार्डवर बॅलन्स . म्हणजे पुन्हा पन्नास रुपयांची लुट . पहिल्यांदा दोनशे घेतल्यावरच कार्ड पोस्टाने का नाही पाठवत. या व्यवहारात कोण कोण आहे याची चौकशी झाली पाहिजे आणि दोषींवर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे तरच कार्ड काढणाऱ्यांना न्याय दिल्या सारखे होईल.

मुळात कार्ड काढण्यासाठी एसटी महामंडळाने एजन्सीची नेमणूक करू नये . उलट प्रत्येक बस स्थानकात एखादा कर्मचारी नियुक्त करून दिवसभर कार्ड काढण्याची प्रक्रिया करावी . शहरात फिरून कार्ड विषयी सांगणारे रिक्षा भोंग्या सह फिरवाव्यात म्हणजे आतापर्यत त्यांचे कार्ड काढणे राहून गेले होते ते आता कार्ड काढून घेतील .

कार्ड काढण्याचे एजन्सीला देऊ नये . म्हणजे कमी पैशात कार्ड निघत असल्यामुळे प्रवाशांची लुट होणार नाही, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे

सुसंस्कृत लातूरची ओळख जपूया, सामाजिक एकोपा वृद्धिंगत करूया : जिल्हाधिकारी

यंदाही लातूर जिल्ह्यात 'डीजे मुक्त' गणेशोत्सव -- बाहेर जिल्ह्यातून येणाऱ्या 'डीजे'वर पोलीस गुन्हे दाखल करणार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ५ सप्टेंबर : शांतताप्रिय आणि सुसंस्कृत जिल्हा अशी लातूरची सर्वत्र ओअख आहे, ही ओळख जपण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. आगामी काळातील सर्व उत्सव सर्व जाती-धर्मीय बांधवांनी एकोप्याने साजरे करावेत. या उत्सवांच्या माध्यमातून सामाजिक एकोपा वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले. दयानंद सहभागृह येथे गोकुळाष्टमी, पोळा व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित लातूर जिल्हा शांतता समिती बैठकीत ते बोलत होते.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा लातूर ग्रामीणच्या उपविभागीय पोलीस अधिकारी मेघना आय. एन., उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नन्हे-विरोळे, उपविभागीय पोलीस अधिकारी समिरसिंह साळवे यांच्यासह पोलीस व जिल्हा प्रशासनातील अधिकारी तसेच लातूर शहर व जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

गतवर्षीप्रमाणे यंदाही लातूर जिल्ह्यात 'डीजे'मुक्त गणेशोत्सव साजरा होणार असून गणेशोत्सव मंडळानी पारंपारिक वाद्ये, ढोल-ताशा, झांज पथक, पारंपरिक वाद्ये, लोककला आणि लोकनृत्यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यामुळे उत्सवाला पारंपरिक स्वरूप प्राप्त होण्याबरोबरच स्थानिक कलाकार व कलापथकांनाही रोजगाराची संधी उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले.

गणेशोत्सवाच्या काळात सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक गणेश मंडळाने आपल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. शक्य असल्यास ही यंत्रणा गणेशोत्सवानंतरही कायमस्वरूपी कार्यरत ठेवावी. पोलीस आणि गणेश मंडळांमध्ये प्रभावी समन्वय राहावा, यासाठी यंदा 'एक मंडळ-एक पोलीस अंमलदार' ही अभिनव संकल्पना राबविण्यात येणार आहे. प्रत्येक गणेश मंडळासाठी नियुक्त करण्यात येणारा पोलीस अंमलदार मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून गर्दी व्यवस्थापन, मिरवणूक नियोजन, सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेसंदर्भात आवश्यक मार्गदर्शन करणार आहे. गणेशोत्सव मंडळानी विनापरवानगी मंडप अथवा मिरवणूक काढू नये, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी गणेशोत्सव काळात करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी उपस्थितीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनीही आपल्या सूचना मांडल्या.

लातूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गतवर्षी प्रमाणे यंदाही 'डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करावा. यंदाही गणेशोत्सवात डीजे व कर्णकर्कश ध्वनिप्रक्षेपण यंत्रणेला परवानगी दिली जाणार नसल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्पष्ट केले. तसेच जिल्ह्याबाहेरील डीजे आणल्यास संबंधित डीजे मालक आणि मंडळांच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. त्यामुळे गणेशोत्सवाची सांस्कृतिक परंपरा जपत मंडळांनी मिरवणुकांमध्ये लेझीम, कला प्रकारांना प्राधान्य द्यावे. तसेच गणेश मंडळाकडून उभारण्यात येणाऱ्या देखाव्यांमधून पर्यावरण रक्षण, वृक्षरोपण, जलसंधारणाबाबत जनजागृती करावी. उत्सवाच्या माध्यमातून प्रबोधनाची परंपरा कायम ठेवत इतरांसमोर नवा आदर्श निर्माण करावा. गणेशोत्सव काळात सार्वजनिक गणेश मंडळांना आवश्यक सर्व परवानग्या एकाच ठिकाणी दिल्या जातील. त्यामुळे आवश्यक परवानगी घेवूनच उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यावेळी म्हणाले.

एका दिवसात ५० हजारांचा दंड वसुल

तभा वृत्तसेवा

लातूरदि.५ सप्टेंबर :हेल्मेटविना दुचाकी चालवणाऱ्यांवर पोलिसाकडून कार्यवाही सुरू असून अवघ्या एक दिवसातच पन्नास हजाराचा दंड वसूल करण्यात आला आहे. शिरूर आनंतपाळ पोलिस ठाणे आंतर्गत निटूर पोलिस चौकीचे बिट आमलदार सुधीर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखालील लातूर-जहीराबाद महामार्गावरील निटूर मोड चौरस्ता येथे हा पन्नास हजाराचा दंड वसूल करण्यात आला.

जिल्हा पोलिस प्रशासन व संयुक्त तालुका पोलिस प्रशासनाच्या वतीने ही कार्यवाही केली जात आहे. हेल्मेट सक्ती १ सप्टेंबरपासून लागू करण्यात आली आहे. निटूर पोलिस चौकीचे कदम केंद्रे, पप्पू कांबळे यांनी हा हा दंड वसूल केला. हेल्मेट घालून आलेला चालकांना पुष्प देऊन स्वागतही करण्यात आले.

आ. बसवराज पाटलांनी घेतला मनपा कारभाराचा आढावा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ सप्टेंबर : लातूर-धाराशिव-बीड स्थानिक स्वराज्य संस्थेचे नवनिवार्चित आमदार तथा माजीमंत्री बसवराज पाटील यांनी शुक्रवारी महानगरपालिकेस सदिच्छा भेट दिली. यावेळी प्रशासनाच्यावतीने आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी त्यांचे स्वागत केले. उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत आ. पाटील यांनी महापालिकेच्या कामकाजाचा आढावा घेत अडचणी जाणून घेतल्या. या बैठकीकडे सत्ताधारी काँग्रेस महाविकास आघाडीचे महापौर, उपमहापौरांसह पदाधिकारी व नगरसेवकांनी पाट फिरवत अघोषित बहिष्कारच टाकला. परिणामी केवळ विरोधी पक्ष असलेल्या भाजप सदस्यांसमवेत आ. पाटील यांनी संवाद साधला. पाटील यांच्या पहिल्याच भेटीकडे काँग्रेसने फिरविलेली पाट म्हणजे काँग्रेसच्या कोत्या मनाच्या राजकारणाची ही प्रचिती असल्याचेच नमूद करीत विरोधकांसह लातूरकरांनी टीकेचा सूर व्यक्त केला आहे.

शुक्रवारी, आ. बसवराज पाटील यांनी महापालिकेत येऊन पदाधिकाऱ्यांसह अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी आयुक्त राहुल कुलकर्णी, विरोधी पक्षनेते देविदास काळे, भाजपचे शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, गटनेते ॲड. दीपक मठपती, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, उपायुक्त वसुधा फड यांच्यासह भाजपचे नगरसेवक, पालिकेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी आ. पाटील यांनी अधिकारी व नगरसेवकांकडून लातूरच्या समस्या जाणून जाणून घेतल्या. प्रत्येक नगरसेवकांनी लातूरच्या संभाव्य पाणीटंचाईसह हक्काचे जीएसटी अनुदान वाढवून मिळण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. आ. बसवराज पाटील हे भाजपचे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विजयी झालेले पहिलेच आमदार पहिल्यांदा महापालिकेत आले. त्यांनी सर्वांच्या समस्या जाणून घेतल्या. भाजपच्या आमदाराचे पहिल्यांदाच महापालिकेत आगमन झाल्याचा आनंद भाजप नगरसेवकांमध्ये दिसून येत होता. प्रशासनानेही पोटतिडकीने अमृत-२ अंतर्गत लागणाऱ्या निधीसह जीएसटी अनुदान वाढीची मागणी आ. पाटील यांच्याकडे केली.

१२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालत

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.५ सप्टेंबर : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये येत्या १२ सप्टेंबर, २०२६ रोजी 'राष्ट्रीय लोकअदालती'चे आयोजन करण्यात आले आहे. वेळ आणि पैशांची बचत करणाऱ्या या संधीचा लाभ घेऊन पक्षकार आणि विधीज्ञांनी १२ सप्टेंबर, २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपले वाद आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय भारुका, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. एन. गिरवलकर आणि लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष एस. डी. जाधव यांनी केले आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली व तडजोडीस पात्र असणारी विविध दिवाणी आणि फौजदारी प्रकरणे, परक्राम्य संलेख अधिनियमातील कलम १३८ नुसार दाखल धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, कौटुंबिक विवाद, मोटार वाहन अपघात दाव्यांची प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, कामगार व औद्योगिक न्यायालयांतील विषय तसेच बँकांशी संबंधित प्रलंबित खटले तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय बँक आणि विविध वित्तीय संस्थांची वाद-पूर्व प्रकरणेसुद्धा या लोकअदालतीत सामोपचाराने मिटवण्यासाठी मांडली जाणार आहेत. लोकअदालतीच्या माध्यमातून दोन्ही पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची पूर्ण संधी उपलब्ध होते आणि परस्पर संमतीने व सामंजस्याने वादावर कायमस्वरूपी तोडगा काढता येतो. लोकअदालतीमध्ये दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने प्रकरण यशस्वीरीत्या निकाली निघाल्यास नियमानुसार न्यायालयात भरलेले न्यायालयीन शुल्क (कोर्ट फी) परत मिळण्याची तरतूद आहे. त्यामुळे वेळ आणि पैशांची बचत करणाऱ्या या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन पक्षकार आणि विधीज्ञांनी १२ सप्टेंबर, २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे मोठ्या संख्येने आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

साखरेच्या गोडव्यात हरवली नातीगोती ..?

तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे

औसा दि. ५ सप्टेंबर : जीवनाश्यक वस्तूचा दर कमी व्हावा.यासाठी केंद्र सरकारने १८ टक्याचा जीएसटी कमी करून ५ टक्यावर आणला. यातून कांहीं काळासाठी किंमती कमी होऊन स्थिरावल्या होत्या.याचा यावर्षीच्या दुष्काळाच्या उंबरठ्यावर असलेल्या सर्वांनाच फायदा होईल. असे वाटत असतानाच वर्षातील ऐण श्रावणातील सणांच्या तोंडावर सर्व वस्तूंच्या किंमतीत कमी अधिक प्रमाणात वाढ झाली.तर साखरेच्या किंमतीत ४० रूपया हून थेट ८२ रूपये अशी दुपटीपेक्षा अधिक वाढ झाल्याने हॉटेल चालकांनी गावात चहाचा दर दुपटीने वाढविला.याचा फटका सर्वत्र दिसून येत असला तरी आवर्जून दररोज, एकमेकांना भेटणारी मित्रमंडळी, पाहुणे रावळे आता कट मारणे पसंत करत आहेत.त्यामुळे साखरेच्या गोडव्यात नातीगोती हरवली.. ? असे विदारक चित्र गावागावात दिसून येत आहे.

यंदाचा खरीप हंगाम दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभारल्यामुळे एकमेकांनी गाठीभेटी,सोयरिकीच्या बोलीचालीला आजतरी बगल देणे पसंत केले आहे. आणि प्रत्येकांनी दिवाळीनंतरच कामाचं पाहू असा मानस करून होणाऱ्या घडामोडींची गती थांबवली आहे.केंद्र सरकारने सततच्या वाढत्या करवाढीला बगल देत यावर्षीच्या अर्थसंकल्पात १८ टक्यावरून थेट ५ टक्यावर कर आणून सर्वसामान्यांना एकीकडे दिलासा दिला.अवघ्या तीन महिन्यांत चाळिशीच्या आसपास राहणाऱ्या साखरेने ४४रूपये,४६रूपये,४८रूपये वरून पन्नाशी गाठली. यावर दरवाढ थांबेल. असे वाटत असतानाच थेट ५६ रूपयांवर पोहोचला.यानंतर ६० रूपया वरून मोठी वाढ होत साखरेने सत्तरी गाठली. एवढ्यावर न थांबता ७२ रूपये आणि यामध्ये पुन्हा एकदा चांगली वाढ होत ८२ रूपयांपर्यंत ग्रामीण भागात पोहंचला.

यावेळी यंदा पावसाअभावी वाढ खुटलेल्या,आर्थिक अडचणींमुळे अपुऱ्या खतमात्रेवर शेवटच्या घटिका मोजणाऱ्या उभ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या भुवया उंचावल्या होत्या. तर दुसरीकडे खरिप हंगामातील उडीद,मुग, सोयाबीन या नगदी पिकांनी एकापाठोपाठ शेतकऱ्यांकडे पाठ फिरवल्यामुळे व तूर पिक रामभरोसे दिसत असल्याने यंदा उत्पादन कमी का होईना परंतू साखरेचे दर वाढल्याने शेतकऱ्यांनी आपला मोर्चा ऊस पिकाकडे वळविला.या काळात साखरेची दरवाढ झाली.असे नाही.गरा,पोहे, साबुदाणा यामध्ये १० टक्यापर्यंत वाढ झाली आहे.खाद्यतेलात २०टक्के तर भगर आणि तांदूळ यामध्ये दीडपट वाढ झाली आहे.याचबरोबर सर्वच जिवनाश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ झाली आहे.

श्रावणातील सणांच्या महिन्यात या जिवनावश्यक वस्तूंच्या दरात झालेल्या दरवाढीमुळे शेतकऱ्यांसह मजुरांचे यंदा आर्थिक गणित पार कोलमडून गेले आहे.या श्रावणातील पंचीम,राखी पौर्णिमा, गोकुळाष्टमी,पोळा या सणांवर परिणाम दिसून येत आहे.तर या महिन्यात चालू हंगामातील शेतातील कामांची विश्रांती असते.याबरोबर उपवासाचा व सण साजरे करण्याचा महिना असल्याने या महिन्यात सकाळी पारावर, ओट्यावर व चौकात बसलेली मंडळी रामराम करीत एकमेकांना चहापाणी करतात. परंतू साखरेच्या दर वाढीपासून हॉटेल चालकांनी चहाच्या दरात दुपटीने वाढ केली आहे.

त्यामुळे सगेसोयरे, मित्रमंडळीनी चहा पाण्याच्या पारंपरिक पाहुणचाराला बगल देणे पसंत केले आहे.तर कांहीं मित्रमंडळी मोबाईल वरून बोलताना मी आज शेतातच आहे, बाहेरगावी आलो आहे. अशा थापा देत दुचाकीवरून गावातच फिरताना दिसत आहेत. दुष्काळापेक्षा अधिक या दरवाढीचा एवढा मोठा धसका मजुरापासून अडीच एकरच्या अल्प उधारकासह ५० एकरांच्या जमिन धारकांनी घेतला असल्याचे चित्र गावागावात दिसत आहे. त्यामुळे साखरेच्या गोडव्यात मित्रमंडळी, नातीगोती हरवली...?याचे उत्तर आगामी काळात दिसणार आहे.

वासुदेव समाजाचे प्रश्न सभागृहात मांडणार : आ. कल्याणकर

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ५ सप्टेंबर -

वासुदेव समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी आपण प्रयत्नशील असून, समाजाच्या प्रश्नांना विधानसभेच्या सभागृहात वाचा फोडणार असल्याचे आश्वासन आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी दिले. तर नांदेड शहरात जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करून न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नांदेड येथे वासुदेव समाजसेवा संघाच्या वतीने गोकुळाष्टमीनिमित्त छोटेखानी दहीहंडी उत्सव नांदेड शहरातील साईबाबा मंदिर , चैतन्य नगर येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आमदार बालाजीराव कल्याणकर प्रमुख उपस्थित होते यावेळी ते बोलत होते.

यावेळी गोकुळाष्टमीनिमित्त आयोजित दहीहंडी कार्यक्रमात वासुदेव समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. समाजातील गुणवंत व्यक्तींचा गौरव केल्यामुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळते, असेही मान्यवरांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमास माजी सभापती विनायक सगर, विकासभाऊ तरोडेकर, वासुदेव समाजाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण डोईजड, कार्याध्यक्ष बालाजी डोईजड, उपाध्यक्ष जगदीश उमरीकर, पांडुरंग शिंगनाथ, सूर्यकांत डोईजड, राम घोगरे , रोकडोबा डोईजड, तुळशीराम डोईजड , पत्रकार ज्ञानेश्वर डोईजड, युवा पदाधिकारी करण रोडगे, भारत चव्हाण, अभिशेक गुरखेल, भारत शिंदे, देविदास हादवे, एल.बी.चव्हाण, रुखमाजी शिंदे, राहुल डोईजड देवीदास पेंढारकर उपस्थित होते तर वासुदेव कलावंत पिराजी डोईजड, माधव रोडगे,आणि शिवाजी पेंढारकर, पिंटू कानडे, अशोक घोगरे, संतोष पाचंगे, गजानन ढवळे, निर्गुण घोगरे, अशोक तारापुरे, नारायण तारापुरे, सुधाकर रेनके, ऋषी रेनके, बालाजी पाचंगे, यशवंत घोगरे , विश्वनाथ पेंढारकर आदी वासुदेव कलावंत यांनी आपली कला सादर केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवाजी पेंढारकर, गणेश चव्हाण, उद्धव डोईजड तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश उमरीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सूर्यकांत डोईजड यांनी केले.

गोकुळाष्टमीनिमित्त श्रीकृष्ण भगवान ची पालखी काढून दहीहंडी फोडण्यात आली. या कार्यक्रमामुळे वासुदेव समाजातील नागरिकांम ध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमास वासुदेव समाजातील लोककलावंत, समाजबांधव, महिला, नागरिक , युवक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

मुदखेड पोलिस ठाण्याकडे जाणारा रस्ता अंधारात

तभा वृतसेवा
मुदखेड, दि. ५ सप्टेंबर -

मुदखेड शहरातील पोलिस ठाण्याकडे जाणारा प्रमुख रस्ता रात्रीच्या वेळी अंधारमय होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या मार्गावरून रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निम र्ण झाले असून, अंधाराचा फायदा घेऊन काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

याबाबत मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्याशी विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, रस्त्यावरील पथदिव्यांच्या समस्येबाबत संबंधित नगरपरिषद अधिकाऱ्यांना अनेकदा माहिती देण्यात आली आहे. मात्र, अद्याप यावर ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नागरिकांशी चर्चा केली असता, रात्रीच्या वेळी हा रस्ता पूर्णपणे अंधारात असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना म ोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. अंधारामुळे चोरी, छेडछाड किंवा इतर कोणताही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीतीही नागरिकांनी व्यक्त केली. पोलिस ठाण्याकडे जाणाऱ्या रस्त्यासारख्या महत्त्वाच्या मार्गावरच प्रकाशव्यवस्था नसणे ही गंभीर बाब असून, मुदखेड नगरपरिषद प्रशासन याची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने पथदिवे सुरू करणार का? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

ई पीक पाहणीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी

बाऱ्हाळी-शेतकरी बांधवांनी ई पीक पाहणीची प्रक्रिया प्रलंबित न ठेवता संबंधित सहाय्यक यांच्या म ाध्यमातून ती तातडीने पूर्ण करून घ्यावी असे आवाहन कमळेवाडी येथे ई पीक पाहणीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी व तपासणी करतांना मूखेडचे तहसीलदार अभयराज नंजुंडे यांनी केले यावेळी त्यांनी उपस्थित शेतकरी बांधवांशी संवाद साधताना ई पीक पाहणीचे महत्त्व समजावून सांगितले विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना ई पिक पाहण्याची नोंद अत्यंत महत्त्वाचे ठरते त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची अचूक माहिती वेळेत नोंदवून घ्यावी असेही त्यांनी सांगितले. ई पीक पाहण्याच्या माध्यमातून पिकांची अधिकृत नोंद उपलब्ध होत असल्याने पीक विमा, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पिकांचे नुकसान, क्रषी विषयक विविध योजना व शासनाच्या मदतीला घेताना या नोंदीचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आले. यावेळी त्यांनी तालुक्यातील सर्वच शेतकऱ्यांनी ई पिक सहाय्यक यांच्या मदतीने करण्याचे आवाहन केले. या वेळी तहसीलदार अभयराज नजुंडे यांच्या समवेत ई पिक पाहणी सहाय्यक विशाल राठोड, सरपंच प्रतिनिधी सूनिल राठोड, भिमराव पा. सादगीर, मडळ अधिकारी गरुडकर, ग्रामसेवक देशमुख, तलाठी औदुंबर वाडीकर, महसूल सेवक गणेश बडे, लक्ष्मण शिंदे, बलभीम चावरे, पांडूरंग श्रीरामे, नामदेव श्रीरामे यांच्या सह गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते

नांदेड जिल्ह्यात संपूर्ण दारुबंदीची मागणी; निर्णय न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ५ सप्टेंबर -

नांदेड जिल्ह्यात वाढत असलेल्या अवैध दारूविक्री आणि हातभट्ट्यांमुळे गंभीर सामाजिक, कौटुंबिक व आर्थिक समस्या निर्माण होत असल्याचा आरोप करत शिवसेना उपतालुका प्रमुख तथा समाजसेविका सौ.भाग्यश्री कोंडीबा कल्याणकर यांनी जिल्ह्यात संपूर्ण दारुबंदी लागू करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे निवेदन सादर करण्यात आले असून,१४ सप्टेंबर २०२६ पर्यंत ठोस निर्णय न घेतल्यास १५ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की,नांदेड जिल्ह्यातील अनेक भागांत अवैध व अनधिकृत दारूविक्री सुरू असून त्याचा गंभीर परिणाम शेतकरी,मजूर व कष्टकरी कुटुंबांवर होत आहे. दारूच्या व्यसनामुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून,घरगुती वाद,महिलांवरील अत्याचार,लहान मुलांना मारहाण, रस्ते अपघात तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

अनेक गावांमध्ये महिला व ग्रामस्थांनी दारुबंदीसाठी तक्रारी आणि ग्रामसभांचे ठराव करूनही अवैध दारूविक्री व हातभट्ट्यांवर अपेक्षित कारवाई होत नसल्याची खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

किनवट आगारात पाच 'राजमाता जिजाऊ' बस दाखल

तभा वृतसेवा
किनवट, दि. ५ सप्टेंबर -

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन म हामंडळाच्या किनवट आगारात नव्याने दाखल झालेल्या पाच 'राजमाता जिजाऊ' बसगाड्यांचे लोकार्पण आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी आमदार केराम म्हणाले की, किनवट आगारातून दररोज सुमारे पाच हजार प्रवासी व भाविक प्रवास करतात. माहूरच्या रेणुकामाता मंदिरामुळे भविष्यात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगाराची क्षमता भविष्यात दररोज २० हजार प्रवाशांच्या वाहतुकीस सक्षम करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. आगार व बसस्थानकाचा बीओटी तत्त्वावर नियोजनबद्ध विकास करून प्रवासी व भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करणार, अशी ग्वाही आमदार केराम यांनी दिली.

यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, भाजपा विधानसभा प्रमुख बाबुराव केंद्रे, भाजप मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, शिवसेना (उ.बा.ठा) शहरप्रम ुख प्रशांत कोरडे, आगार प्रमुख अशोक चव्हाण यांच्यासह कार्यक्रमास वाहतूक अधीक्षक शीलरत्न ढगे, वाहतूक नियंत्रक राजकिरण नेमानीवार, वाहतूक निरीक्षक बालाजी केंद्रे, वाहतूक नियंत्रक सिद्धार्थ महादेव, वाहन परीक्षक डी. जे. कोंडे, लेखापाल एस. आर. जाधव, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय कन्नलवार, सागर पलीकोंडावार, वाहनचालक गजानन चंद्रे, वाहक उत्तम राठोड, अंकुश चव्हाण, संजय केंद्रे आदी उपस्थित होते. एस. टी महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी व प्रवासी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंढरीनाथ कोंकेवाड यांनी केले, तर आभार पत्रकार संतोष अनंतवार यांनी मानले.

सोमवारी आफ्रोह संघटनेचे महाराष्ट्रभर निदर्शने आंदोलन

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ५ सप्टेंबर -

अन्यायग्रस्त आदिवासी म न्नेरवारलू, कोळी महादेव, कोळी मल्हार, टोकरे कोळी, ढोर कोळी, माना, हलबा, हलबी व इतर ३३ अनुसूचित जमातींना जात प्रमाणपत्र व जात वैधता न मिळणे, मिळालेली जातवैधता लबाडीने व फसवणूक करून अवैध करणे, घटनात्मक हक्कापासून वंचित ठेवणे आदिवासी विभागाच्या या इतर अनेक बाबतीत केल्या जाणार्या अन्यायाविरुद्ध न्याय मिळवण्यासाठी नारे निदर्शने आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रासह नांदेड येथे सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ५ या वेळात जिल्हाधिकारी कार्यालय येथे हे आंदोलन करण्यात येणार आहे.

राजपत्र दि. २२ जुलै २०२६ मधील जात प्रमाणपत्र (सुधारणा) कायदा -२०२६, ६१ क्रमांकाचा कायदा/विधेयक रद्द करणे किंवा योग्य तो बदल करणे. जातवैधता प्रमाणपत्राची सु-मोटो पुनर्तपासणी न करणे. विलंबाने जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या अ.ज. कर्मचार्यांस पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नतीचे लाभ देणे. रक्त नात्यात कुटुंबातील सदस्यांची वैधता झाली असेल तर इतरांना ती तात्काळ, विनाचौकशी, सहजपणे मिळण्याचा आदी प्रमुख मागण्यांसाठी निदर्शने करण्यात येणार आहेत.

सिडकोत शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सत्कार

नवीन नांदेड -शिक्षक दिनानिमित्त सिडकोतील शिक्षकांना पेन आणि गुलाब पुष्प देऊन सामाजिक कार्यकर्ते अवतार सिंग सोडी महाराज व त्यांचे मित्र मंडळ यांच्या वतीने शिक्षकांचा सत्कार करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. शिक्षक दिन हा भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त पूर्ण भारतभर साजरा केला जातो. विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या आणि राष्ट्रनिर्मितीमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांचा ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त सन्मान केला जातो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडण-घडणात गुरूंचे स्थान किती महत्त्वाचे आहे या सर्व कार्यांचे महत्त्व हा दिवस आठवण करून देतो. हीच आठवण लक्षात ठेवून सिडकोचे सामाजिक कार्यकर्ते अवतारसिंग सोडी महाराज आणि त्यांचे मित्र मंडळ यांनी दिनांक ५ सप्टेंबर रोजी सिडकोतील कुसुम ताई विद्यालय प्राथमिकच्या मुख्याध्यापक शशिकलाताई जाधव व सर्व शिक्षक, शिवाजी विद्यालय येथील नरसिंह विद्यामंदिर प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना एकुंडवार व सर्व शिक्षक, इंदिरा गांधी हायस्कूल हडकोचे उप मुख्याध्यापक माधाळकर एस.के. व सर्व शिक्षक, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय हडको येथील संस्थापक अध्यक्ष राजेश महागावे व मुख्याध्यापिका सुमित्रा टेंगेटोर सह सर्व शिक्षक, राष्ट्रमाता कस्तुरबा गांधी हायस्कूल येथील मुख्याध्यापक अरुण कासराळीकर सह सर्व शिक्षक, गोदावरी पब्लिक स्कूल सिडको येथील मुख्याध्यापक गोविंद तोरणे सह सर्व शिक्षक तसेच विद्यानिकेतन प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विनया बनवसे व प्राथमिकचे मुख्याध्यापक स्वामी यु.व्हि. सह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पेन व गुलाब पुष्प देऊन सामाजिक कार्यकर्ते अवतार सिंग सोडी, राजू टमन्ना, सचिन बारटक्के व मित्र मंडळ तसेच दै.तरूण भारतचे पत्रकार तथा व्हाईस ऑफ मीडिया दक्षिण नांदेडचे अध्यक्ष संभाजी सोनकांबळे यांनी शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

सगरोळीतील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वनजमिनीचा प्रश्न तातडीने सोडवा : शंकर महाजन

तभा वृतसेवा
बिलोली, दि. ५ सप्टेंबर -

सगरोळी, ता. बिलोली, जि. नांदेड येथे सन १९७० पासून कार्यरत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेबाबत निर्माण झालेला वनविषयक प्रश्न तातडीने सोडवून नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम म ार्गी लावावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे नांदेड जिल्हाध्यक्ष शंकर म हाजन यांनी केली आहे. याबाबत त्यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

सगरोळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातून गेल्या अनेक दशकांपासून परिसरातील नागरिकांना आरोग्य सेवा दिली जात आहे. उपलब्ध अभिलेखानुसार ग्रामपंचायतीच्या नमुना क्र. ८ मध्ये सदर जागेची भोगवटदार म्हणून नोंद असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत, अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवासस्थाने तसेच प्रसूती कक्ष आदी शासकीय बांधकामे पूर्वीपासून अस्तित्वात आहेत.

मात्र प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत जुनी व मोडकळीस आलेली असल्याने रुग्ण, गर्भवती महिला, बालके, वृद्ध नागरिक तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे नवीन इमारत उभारणे अत्यावश्यक असल्याचे महाजन यांनी निवेदनात म्हटले आहे. २.५० कोटींचा निधी मंजूर, तरी बांधकाम रखडले जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड यांनी २६ सप्टेंबर २०२५ रोजी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी रु. २५० लक्ष (२.५० कोटी रुपये) निधी मंजूर झाल्याची माहिती जिल्हा परिषद बांधकाम विभागाला दिली आहे. मात्र सदर जागेबाबत वनजमिनीचा प्रश्न निर्माण झाल्याने प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यात अडथळे येत आहेत.

शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही केवळ वनविषयक परवानगीच्या प्रश्नामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यावश्यक असलेली आरोग्य सुविधा रखडणे ही गंभीर बाब असल्याचे महाजन यांनी म्हटले आहे.

संयुक्त पाहणी करून मार्ग काढण्याची मागणी

वनजमिनीचा बिगर-वनीकरण वापर करण्यासाठी लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींचे पालन करून या प्रकरणातून मार्ग काढावा, अशी भूमिका महाजन यांनी घेतली आहे. वन विभागाने तातडीने सदर जागेची स्थळ पाहणी करून संबंधित अभिलेख तपासावेत. तसेच महसूल, आरोग्य, बांधकाम, ग्रामपंचायत आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन पंचनामा व स्थळ पाहणी अहवाल तयार करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

सदर जमीन वन विभागाच्या अभिलेखात वनजमीन असल्याचे स्पष्ट झाल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र हा अत्यावश्यक सार्वजनिक आरोग्य सुविधेचा प्रकल्प असल्याने लागू कायदेशीर प्रक्रियेनुसार वनजमीन हस्तांतरण अथवा वळविण्याचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे तातडीने सादर करावा. तसेच आवश्यक असल्यास वनपरवानगी मिळवून देण्यासाठी संबंधित विभागाने कार्यवाही करावी, अशी म ागणी करण्यात आली आहे.

सन १९७० पासूनचा प्राथमिक आरोग्य केंद्राचा वापर, ग्रामपंचायत नम ुना क्र. ८ मधील नोंद, अस्तित्वातील शासकीय बांधकामे आणि मंजूर निधी या सर्व बाबींची अभिलेखीय तपासणी करून स्पष्ट अहवाल द्यावा, असेही निवेदनात नमूद आहे.

ग्रामसखींचा ऑनलाईन कामावर बहिष्कार

तभा वृतसेवा
भोकर, दि. ५ सप्टेंबर -

तालुक्यातील ग्रामसखी संघटनेच्या सर्व महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. मागण्या तात्काळ मंजूर करण्यात याव्यात, अन्यथा मागण्या पूर्ण होईपर्यंत ग्रामीण भागातील ऑनलाईन कामे बंद ठेवण्यात येतील, असा इशारा देत ग्रामसखी कर्मचाऱ्यांनी ३ सप्टेंबर रोजी तहसीलदार, भोकर यांच्यामार्फत 'उमेद'कडे निवेदन सादर केले.निवेदनात ग्रामसखी कर्मचाऱ्यांना आश्वासित करण्यात आलेला १० लाख रुपयांचा विमा तात्काळ लागू करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. कर्तव्य बजावत असताना काही ग्रामसखी कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून, त्यांच्या कुटुंबीयांना अद्याप विम्याचा लाभ मिळालेला नसल्याने संबंधित कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील काही ग्रामसखी कर्मचाऱ्यांना वाढीव मानधनापासून वंचित ठेवण्यात आले असून, त्यांना तात्काळ वाढीव मानधन देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.ग्रामसखी कर्मचाऱ्यांचे मानधन १५ हजार रुपये, तर प्रभाग संघ क्षेत्रातील केडर कर्मचाऱ्यांचे मानधन २४ हजार रुपयांपर्यंत वाढवावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय ग्रामसखींच्या कार्यक्षेत्राबाहेर कामासाठी जावे लागल्यास

प्रवासभत्ता देण्यात यावा, तसेच काम करताना येणाऱ्या विविध तांत्रिक अडचणी तात्काळ दूर कराव्यात, अशा विविध म ागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. सर्व मागण्या तात्काळ मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी; अन्यथा मागण्या पूर्ण होईपर्यंत केवळ ऑफलाईन काम करण्यात येईल आणि ऑनलाईन कामे पूर्णपणे बंद ठेवण्यात येतील, असा स्पष्ट इशारा ग्रामसखी कर्मचाऱ्यांनी प्रशासनाला दिला आहे.

तामिळनाडू प्रमाणे टीईटी मधून शिक्षकांना मुक्त करा :'आस ' संघटना

नांदेड -सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाने, प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या प्राथमिक शिक्षकांना, टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक केले.मात्र सेवेचे ५ वर्ष शिल्लक असलेल्या कार्यरत शिक्षकांना टीईटीतून सूट दिली. इ.स.२०१३ ला महाराष्ट्र राज्य शासनाने, प्राथमिक शिक्षक पदीच्या नियुक्तीसाठी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेसह टीईटी परीक्षा उत्तीर्ण असणे सक्तीचे केले. तद्वतच टीईटी परीक्षेसंदर्भात शासन निर्णय इ.स. २०१३ ला पारीत केला. परंतू इ.स.२०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांना टीईटी संदर्भात, महाराष्ट्र राज्य शासनाने किंवा मा. न्यायालयाने , इ.स.२०१३ पूर्वी कोणताच निर्णय पारीत केलेला नव्हता. अशा स्थितीत, आता सर्व कार्यरत प्राथमिक शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण व्हा अन्यथा सेवेतून कार्यमुक्त करण्यात येईल. हा निर्णय शिक्षकांवर लादणे म्हणजे आरटीई ॲक्ट लागू होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षकांवर अन्यायच होय. सदरप्रमाणे होत असलेला अन्याय दूर व्हावा म्हणून यापूर्वीही राज्य शासनाकडे 'आस ' शिक्षक संघटनेने मागणी केलेली आहे. नुकतेच तामिळनाडू सरकारने, इ.स. २०१० पूर्वी म्हणजेच आरटीई ॲक्ट लागू होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांना, टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीतून, मुक्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे तामिळनाडूमधील, सर्व प्राथमिक शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे. इ.स. २०१० पूर्वी महाराष्ट्र राज्यात, नियुक्त झालेल्या आणि सद्या कार्यरत असलेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांना तामिळनाडू सरकारप्रमाणे टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीतून मुक्त करण्यात यावे म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांना, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत , 'आस ' शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

भक्तिरसात रंगला शिवमहापुराण कथेचा सांगता सोहळा

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ५ सप्टेंबर -

शहरातील गणेश नगर मधील श्री गणेश मंदिरात गेल्या काही दिवसांपासून भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या शिवमहापुराण कथेच्या सांगता दिनी परिसरात श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. शिवमहापुराणातील विविध प्रसंग, भगवान शिवाचे महात्म्य, भक्तीची शक्ती आणि मानवी जीवनाला दिशा देणारे विचार यांचे अत्यंत रसाळ व भावपूर्ण निरूपण करण्यात आले.

संगीतमय समर्थ भक्त राघवेंद्र महाराज देशपांडे यांनी आपल्या ओघवत्या वाणीने शिवमहापुराणातील कथाभाग भक्तांसमोर सादर केला. त्यांच्या कथनाला भावपूर्ण संगीताची साथ लाभल्याने संपूर्ण वातावरण शिवभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले.

तबला : आदित्य उपाध्ये आणि पेटी : दत्तात्रय वर्तक यांच्या सुरेल साथीने कथेला अधिकच भावस्पर्शी उंची प्राप्त झाली. कथा, अभंग, भजन, श्लोक आणि संगीताच्या माध्यमातून भक्तांना भगवान शिवाच्या स्वरूपाचे आध्यात्मिक दर्शन घडले.

शिवमहापुराण हे केवळ पुराणकथांचे संकलन नसून, शिव हे विश्वाचे मूळ तत्व असून, मानवी जीवन जगण्याची मूल्यदृष्टी देणारा आध्यात्मिक ग्रंथ आहे. अहंकाराचा त्याग, सत्याचा मार्ग, संयम, परोपकार, श्रद्धा आणि भक्ती यांचे महत्त्व या कथेतून अधोरेखित करण्यात आले. भगवान शिव हे संहाराचे नव्हे, तर अहंकाराचा संहार करून कल्याणाचा मार्ग दाखविणारे देव असल्याचा संदेश कथेतून देण्यात आला.

शिवमहापुराण ग्रंथात एकूण ६ सहिता, १४ खंड व २४,००० श्लोक आहेत. यामधील कथांचा बोध आपल्या दैनंदिन जीवनात जोडला तर जीवनाचा उद्धार नक्की होईल. जगातील शिवमंदिरे व ज्योतिर्लिंग सत्यघटनांची साक्षीदार आहेत, उर्जामंत्री आहेत.

कथेच्या अंतिम टप्प्यात भक्तिमय वातावरण अधिकच उत्कट झाले. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी एकाग्रतेने कथा श्रवण करत आध्यात्मिक अनुभूती घेतली. सांगता प्रसंगी शिवमहापुराणाच्या श्रवणातून मिळालेली शिकवण आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचा संदेश देण्यात आला. संगीत, कथा आणि भक्तीचा सुरेल त्रिवेणी संगम साधत झालेला हा शिवमहापुराण सांगता सोहळा भाविकांच्या स्मरणात कायम राहणारा ठरला. श्रद्धेने भारावलेल्या वातावरणात 'हर हर महादेव'च्या जयघोषात कथेची भक्तिमय सांगता झाली.

या कथेच्या आयोजनात साठी गणेश मंदिर समितीचे संचालक सतिश सामते, प्रविण चिद्दरवार, हर्षद पाटील, प्रा.सतीश पोतदार, पत्तेवार,तुप्तेवार,काप्रतवार, सतिश शिरूरकर, पाठक, कंकाळ, कुर्तडीकर,गणेशनगर महिला मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले.